वर्ष : सोळावे
जानेवारी २०२५
अंक : पहिला
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

## अभिनंदन !

## सन्मान 'राजहंसी' लेखकांचा



साहित्य अकादमी पुरस्कार
२०२४
प्रा. डॉ. सुधीर रसाळ



चँपियन ऑफ दि अर्थ पुरस्कार
२०२४
डॉ. माधव गाडगीळ

# एकच ध्यास...
# समाजाचा वैचारिक विकास

**सोशल मीडियाच्या जमान्यात वाचन संस्कृती जोपासणारे 'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान'**





## पुस्तक वाटप

**'लेखन-वाचन अभियानां'तर्गत संस्कारक्षम गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप**

- खटाव तालुक्यातील २७४ शाळांमध्ये बालसाहित्य संच स्वरूपात ९,००० पुस्तकांचे वाटप
- मावळ तालुक्यातील १६८ शाळांमध्ये पहिलीतील विद्यार्थ्यांना उजळणी पुस्तक भेट

## वाचनालय, ग्रंथालय

**'गाव तेथे वाचनालय आणि शाळा तेथे ग्रंथालय' या उद्देशाने ठोस वाटचाल**

- नंदुरबार जिल्ह्यातून सुरुवात करीत राज्यभरात ४३४ वाचनालयांची उभारणी
- तालुकास्तरावर अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा वाचनालयांची उभारणी

## विद्यार्थी साहाय्य

**ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत**

- ४५० विद्यार्थ्यांना सायकल वाटप; ७० दिव्यांगांना अत्यावश्यक साहित्य वाटप
- आदिवासी, अतिदुर्गम भाग व वीटभट्टी कामगारांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व
- शहरातील झोपडपट्ट्या व पालांवरील मुलांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी प्रयत्न
- ६,००० महिलांना सॅनिटरी पॅड वाटप; २,००० ऊसतोड कामगार महिलांना साडी वाटप

## जुन्या/नव्या पुस्तकांचे करा सत्पात्री दान

महाराष्ट्रात वाचन संस्कृती रुजविण्यासाठी आम्ही 'गाव तेथे वाचनालय'उपक्रम राबवीत आहोत. कृपया, आपल्याकडील जुनी / नवी वाचनयोग्य पुस्तके देऊन आमच्या प्रयत्नांना बळ द्या. कथासंग्रह, काव्यसंग्रह, प्रेरणादायी पुस्तके, बालसाहित्य व स्पर्धा परीक्षा पुस्तके अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांची आम्हाला गरज असते.

**पुस्तक दान करण्यासाठी WhatsApp क्रमांक 73783 78989**

## आर्थिक मदतीचे आवाहन

'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान'चे समाजकार्य असेच पुढे सुरू ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक, खासगी संस्था इत्यादींनी संस्थेच्या विविध उपक्रमांकरिता आर्थिक मदत करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. आपण केलेली मदत '८०जी'अंतर्गत प्राप्तिकर सवलतीस पात्र असेल.



**सचिन म्हसे**

संस्थापक, सद्गुरू सेवा प्रतिष्ठान

इंजिनीअर असलेल्या सचिन म्हसे यांनी कोरोना संसर्गाच्या काळात सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून 'सद्गुरू सेवा प्रतिष्ठान' ही संस्था सुरू केली. विद्यार्थी दत्तक योजना आणि महिला सबलीकरणातील योगदानाबद्दल सचिन म्हसे यांना 'दक्षिण आशियाई प्रादेशिक देश (SAARC) ब्रिलियन्स २०२२' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## सद्गुरू सेवा प्रतिष्ठान

- नोंदणी क्रमांक - महाराष्ट्र /४१६/२०२१/(पुणे)
- ट्रस्ट रजि. नं. - एफ - ५६३२७/ पुणे
- 80G: ABNAS7596NF20224

६७/३, ज्ञानेश सोसायटी, वारजे माळवाडी, पुणे - ४११ ०५८
ई-मेल : sachinmhase@gmail. com
www.sadgurusevapratishthan.org
**+91 73783 78989, 99223 83341**

आमच्या फेसबुक पेजला भेट देण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

वर्ष सतरावे :
अंक पहिला
१५ जानेवारी २०२५

मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ९
- राजहंसी विशेष -
  - *जीवनदर्शी समीक्षक : प्रा. सुधीर रसाळ* (वाङ्मयीन संवाद) / १३
  - *शास्त्रशुद्ध, तर्कशुद्ध आणि ताठ कण्याचा व्रतस्थ अभ्यासक* - उदय कुलकर्णी / १७
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - मन:स्थिती बिघडवून टाकणारा कवितासंग्रह - महेश केळुसकर / १९
- गाऊ त्यांना आरती - *विनोबा* / २५
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / २९
- असे जन्मले पुस्तक!
  *ज्याचं त्याचं एव्हरेस्ट* - मृणालिनी चितळे / ३३
- आठवणींचा पारिजात
  - *आख्यान महानिर्वाण* - श्रीराम रानडे / ३७
- क... कवितेचा - प्रसन्न दाभोलकर / ४१
- उद्‌गार
  *अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास*
  - डॉ. माधुरी जोशी / ४३
  *ऐवज विचारांचा* - हर्ष अनिरुद्ध जोशी / ४५
- राजहंसी पार / ४९
- वाचकांच्या मनातलं... / ५३

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

महाराष्ट्राच्या विचार-विश्वावर स. ह. देशपांडे यांनी विशिष्ट ठसा उमटविला. अर्थकारण, समाजकारण, राष्ट्रवाद आणि ललितवाङ्मय या सर्व क्षेत्रांत पाच दशकांहून अधिक काळ मुशाफिरी करून अनुभवसमृद्ध विचारांचा ऐवज त्यांनी वाचकांसमोर ठेवला. स्वतंत्र लेखनशैली, विचारांतील सखोलता व सूक्ष्मता, तर्कशुद्ध व चिरेबंद मांडणी या त्यांच्या विशेषांमुळे पुढील पिढ्यांनाही मार्गदर्शक ठरेल असे हे पुस्तक.




ऐवज विचारांचा

स. ह. देशपांडे

किंमत : ₹ ५००/-

(ट.ख. ₹ ५०)

डॉक्टर आणि पेशंट यांच्या नात्यात विसंवाद निर्माण होण्यास
कारणीभूत ठरते वैद्यकीय व्यवसायातील चुरस!
वैद्यकीय प्रवेशांतील गोंधळ, याविरुद्धचा लढा,
प्रशासन-विद्यार्थी-पालक आणि माध्यमे यांनी एकमेकांवर व न्याययंत्रणेवर
टाकलेले डावपेच या साऱ्यांचा, प्रत्यक्ष सहभागी झालेल्या तज्ज्ञाने घेतलेला
वृत्तान्तवेध म्हणजे हे पुस्तक -




## शह आणि काटशह

वैद्यकीय व्यवसायातील चुरस

डॉ. राजीव जोशी

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

राग, अनुराग, प्रणय, मीलन, विरह, रुसवा, वंचना, निराशा, पश्चात्ताप, वात्सल्य, हर्ष, खेद... अशा अनंत भावच्छटांना मूर्तरूप देणाऱ्या लताबाईंच्या निवडक पंचवीस गीतांच्या शब्द-सूर-अर्थासह असलेला हा आस्वादक परिचय. क्यूआर कोड स्कॅन करा आणि करा सुरांची सफर...



साठवणीतील गाणी

## सुरांची सम्राज्ञी लता मंगेशकर

डॉ. मृदुला दाढे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)
सवलत किंमत : ₹ १४०/-

---

रसिकांसाठी ही आहे आशाताईंच्या गाण्यांची अद्भुत सफर...
त्यांच्या गायनकलेचा जादुई परिचय...
रसास्वादासोबतच क्यूआर कोड स्कॅन करून
गाणं तत्काळ ऐकण्याची सुविधाही!



साठवणीतील गाणी

## चिरतरुण स्वर आशा भोसले

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)
सवलत किंमत : ₹ १४०/-

मोहम्मद रफी म्हणजे स्वरसंगीतातील ऐट आणि अदब. प्रेम, छेडछाड, विफलता, उद्वेग, नटखटपणा, शुद्ध भक्ती अशा असंख्य भावच्छटा रफी-स्वरातून सहज उमटल्या. हे पुस्तक आहे रफींच्या आवाजातल्या जादूचं रहस्य. त्यांच्या गाण्याचं रसग्रहण आणि क्यूआर कोड स्कॅन करून गाणी ऐकण्याचा आनंदानुभव -




साठवणीतील गाणी

## नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी

डॉ. मृदुला दाढे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)
सवलत किंमत : ₹ १४०/-

---

हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीताचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे किशोर कुमार. व्यक्ती म्हणून त्यांची खासियत, सिनेसृष्टीतील संघर्ष, निवडक गीतांचं रसग्रहण यांचं कलात्मक कथन जरूर वाचा आणि त्यासोबतच क्यूआर कोड स्कॅन करून गाणी ऐकण्याचा आनंद अनुभवा.




साठवणीतील गाणी

## आवाजाचा अवलिया किशोर कुमार

सुहास किर्लोस्कर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)
सवलत किंमत : ₹ १४०/-

साहित्य अकादमी पुरस्कार

# राजहंसची हॅट्ट्रिक




*विंदांचे गद्यरूप* — *२०२४*

*सुधीर रसाळ*

‘विंदां’नी जीवनवेधी कलेचा सिद्धान्त केंद्रस्थानी ठेवून समग्र काव्यशास्त्र उभे केले. या काव्यशास्त्राची मर्मग्राही मीमांसा, तसेच त्यांच्या लघुनिबंधांचा परामर्श म्हणजे हा मौलिक ऐवज!

---

*२०२३* — *ब्राह्मोस*

*अनुवाद : अभय सदावर्ते*




मर्यादित गुंतवणूक, व्यावसायिक व्यवस्थापन, गतिशील निर्णयप्रक्रिया, अनोखी कार्यपद्धती आणि पारदर्शी प्रामाणिकता यांच्या संयोगातून वास्तवास उतरलेले स्वप्न म्हणजे ‘ब्राह्मोस’. या प्रकल्पाच्या निर्माणकर्त्याने सांगितलेली वेधक तितकीच प्रेरक जन्मकथा!

---




*मी संदर्भ पोखरतोय...* — *२०२२*

*पवन नालट*

समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाला भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या कविता!

# संपादकीय

*वाचनवृद्धीसाठी होत असलेले 'संमेलनाआधीचे संमेलन' असेच पुणे पुस्तक महोत्सवाचे वर्णन करावे लागेल. पुस्तकांचाही आनंदोत्सव होऊ शकतो हे या महोत्सवातून दिसून आलं. आयटी हब म्हणून आपली ओळख निर्माण करीत असलेल्या सांस्कृतिक पुणे शहरानं आपण पारंपरिक, मूळ ज्ञानसाधनांची मुळं घट्ट धरून ठेवली असल्याचंच यातून अधोरेखित केलंय आणि वाचकांनी याला दिलेला अभूतपूर्व प्रतिसादही वाखाणण्याजोगा आहे.*

नमस्कार वाचकहो,

२०२४ हे इंग्रजी वर्ष मागे टाकत आपण सन २०२५ मध्ये नव्या उत्साहाने, जल्लोषाने प्रवेश केला आहे. आपल्या आनंदाचं कारणही तसंच आहे. नुकताच केंद्र सरकारने आपल्या मराठी भाषेला दिलेला अभिजात भाषेचा दर्जा ही ती घटना. याशिवाय स्वतंत्र मराठी भाषा विद्यापीठाची घोषणा करून शासनाने मराठीच्या विकासासाठी आणखीही एक आश्वासक पाऊल उचलले आहे. अर्थात या सर्व बाबींसाठी एक मराठी भाषक म्हणून आपलेही सक्रिय योगदान असणे आवश्यक आहे. अन्यथा नेहमीप्रमाणेच नवीन योजना केवळ कागदावर राहतील. यासाठीचे एक आश्वासक चित्र नुकतेच पुणेकरांनी अनुभवले, ते म्हणजे पुणे पुस्तक महोत्सव. मंडळी, तुमच्यासारख्या जाणत्या वाचकांपर्यंत या उत्साहवर्धक घटनेतील महत्त्वपूर्ण बाबी पोहोचायलाच हव्यात; म्हणूनच या माध्यमातून ते आपल्यासमोर मांडत आहे.

दिनांक १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणेकरांच्या अलोट गर्दीत, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात पुणे पुस्तक महोत्सव संपन्न झाला. वाचक - पंढरीच भरली होती जणू!

उद्घाटनाच्या दिवशी पुण्यातील १०१ शाळा - महाविद्यालयांच्या सहभागातून निघालेली ग्रंथदिंडी, लिट-फेस्ट, वैचारिक परिसंवाद, बालचित्रपट महोत्सव, काव्यसंमेलन, विविध पुस्तक दालनांतील पुस्तक प्रकाशन सोहळे, छायाचित्रांचे प्रदर्शन आदींमुळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होण्याआधीच ते या महोत्सवाच्या रूपाने पुण्यातच संपन्न झाले असे वाटले. महोत्सवस्थळी परिसरात ठिकठिकाणी उभारलेली कल्पक वाचकशिल्पे, झाडांच्या फांद्यांवर पुस्तकांची केलेली

सर्जक मांडणी, पुस्तकरूपी आकर्षक बाकांची रचना, विविध पुस्तकांनी साकारलेले भारतीय संविधानाच्या पुस्तकाचे शिल्प यांमुळे वातावरण गजबजून गेले होते. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (नॅशनल बुक ट्रस्ट) पुढाकारातून आणि फर्ग्युसन महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे महानगरपालिका या संस्थांच्या मौलिक योगदानातून हा महोत्सव उत्सवी स्वरूपात संपन्न झाला.

'शांतता पुणेकर वाचत आहेत' या सलग दुसऱ्या वर्षीही घेण्यात आलेल्या उपक्रमात यंदा तब्बल साडेचार लाखांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेऊन वाचन संस्कृतीचं महत्त्व अधोरेखित केलं. समाजातला प्रत्येक घटक या महोत्सवात सहभागी होईल असंच या पुस्तक महोत्सवाचं नेटकं नियोजन होतं. जागतिक कीर्तीचे छोटे - छोटे माहितीपट आणि चित्रपट दाखवून मुलांचं भावविश्व समृद्ध करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न येथे झाला.

अभिराम भडकमकर यांच्या 'इन्शाअल्लाह' या कादंबरीचं अभिवाचन, शालेय मुलांसाठी कथाकथन, चित्रकला-हस्तकला उपक्रमांचे आयोजन, पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड देत बँडसह संगीतमय कार्यक्रमांचा केलेल्या समावेश, फोकआख्यान अशा कार्यक्रमांमुळे महोत्सव उत्तरोत्तर रंगतदार होत गेला. कलशाध्याय ठरावेत असे महोत्सवाचे शेवटचे तीन दिवस होते. दिनांक २० ते २२ या कालावधीत लिट-फेस्टरूपाने रसज्ञांना बौद्धिक मेजवानी मिळाली. यामध्ये शिव खेरा, अक्षय गुप्ता, हरीश भिमानी, गोविंद ढोलकिया, चंद्रप्रकाश द्विवेदी, अरुणा ढेरे, प्रकाश खांडगे, वैशाली करमरकर, दीपक करंजीकर, सदानंद मोरे, विनय सहस्रबुद्धे, इंद्रजीत भालेराव, सदानंद देशमुख, श्रीकांत उमरीकर, विश्वास पाटील अशा इंग्रजी-हिंदी-मराठी मान्यवर लेखकमंडळींचा सहभाग यात होता. अखेरीस ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकरांच्या मौलिक विचारपुष्पाने पुस्तक महोत्सवाची सांगता झाली.

७१ शाळा-महाविद्यालयांतील सुमारे ४००० विद्यार्थ्यांनी खास सहलीद्वारे या पुस्तक महोत्सवाला भेट दिली. पुस्तक महोत्सवाला भेट दिलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला एक पुस्तक मोफत देण्यात आले. संयोजकांकडून 'पुस्तकवारी' या नावाने या कालावधीत एक दैनिक प्रसिद्ध करण्यात आले. त्यामुळे तेथे होत असलेल्या अनेकविध उपक्रमांची नियमित नोंद घेणे शक्य झाले आणि ते संगृहितही झाले.

अहिल्यादेवींच्या जन्म त्रिशताब्दीचे औचित्य साधून फर्ग्युसन महाविद्यालयाच्या इतिहास विभागाने साकारलेले विशेष दालन, वन्दे मातरम या राष्ट्रगीताच्या निर्मितीची दीडशे वर्षे झाल्याबद्दल मिलिंद सबनीस यांनी तयार केलेले दालन, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त सर्वांना पाहण्यास ठेवलेली संविधानाची मूळ प्रत आणि मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे फर्ग्युसन

महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि मराठी अभ्यास परिषदेने मांडलेले विशेष दालन हीदेखील या महोत्सवाची आकर्षणे ठरली. या महोत्सवात काही विश्वविक्रमांचीही नोंद झाली. त्यामध्ये पुस्तकांनी साकारलेले सरस्वती यंत्र, एकाच लेखकाच्या ४८१ पुस्तकांची एकाच दालनात उपलब्धता, पुस्तकांनी साकारलेले संविधानाच्या मूळ प्रतीचे मुखपृष्ठ, अकरा लाखांहून अधिक पुस्तकांच्या मुखपृष्ठांचा ऑनलाइन अल्बम हे ते चार विश्वविक्रम होत.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक तसेच राजेश पांडे, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राध्यापक आनन्द काटीकर या सर्वांचा उत्तम समन्वय आणि सांघिक नेतृत्वातून हा महोत्सव आकाराला आला व यशस्वीही झाला. यंदा महोत्सवात अंदाजे चाळीस कोटींची पुस्तकविक्री झाली असे कळते. हा आकडा कमीजास्त असेलही. तरीही तो केवळ संख्यात्मकदृष्ट्या आनंद देणारा नाही; तर आताची पिढीही पुस्तक विकत घेऊन वाचू पाहतेय, पुस्तकांचं आयुष्यातील मोल जाणतेय याचंही निदर्शक आहे. हे निश्चितच आश्वासक चित्र आहे.

डिसेंबरमधील या पुस्तक महोत्सवाशिवाय पुण्यात संपन्न झालेले प्रशासकीय अधिकारी-साहित्यिकांचे संमेलन, साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचे स्त्री साहित्य संमेलन आदींमुळेही वाङ्मयीन आनंदमेळा वाचकांना अनुभवण्यास मिळाला.

मंडळी, महान निसर्गप्रेमी हेन्री डेव्हिड थोरो म्हणतो, ''वाचन हा एक श्रेयस्कर व्यायाम आहे. शारीरिक कष्टापेक्षा तो तुम्हाला अधिक दमवतो; पण पहिलवानाइतकीच शिस्त आणि चिकाटी त्यालाही लागते.'' या उत्तमाच्या घडणीसाठी आपण सदोदित पुस्तकांच्या सहवासात असायला हवं. चांगलं पुस्तक एकदा वाचून भागत नाही. त्याचं प्रत्येक वाचन एक नवी उमज असते. अखंड वाचनानं मन समृद्ध होतं, जीवनोत्सुक होतं. वाचनाचा खोल संस्कार आपल्या अंतर्मनावर होतो नि विनोबा म्हणतात तसं वाचलेल्या मजकुराच्या अखंड चिंतनातून ते विचारच भावरूप होतात. आपलं जगणं सुंदर करणाऱ्या या मानसिक क्रियेसाठी पुस्तक महोत्सवासारखे जाहीर सामाजिक अभिसरण नितांत आवश्यक आहे. कितीएक मनं यातून घडत जातात.

केवळ मर्यादित काळासाठीच नव्हे तर आता दरवर्षी हा महोत्सव पुण्यात व्हावा, इतरत्रही याचं अनुसरण व्हावं असं वाटतं. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयांचे' या उक्तिसम ही वाचनचळवळ समाजाच्या तळाच्या घटकांपर्यंत पोहचो हीच नूतन वर्षात पदार्पण करताना आपण सर्वात्मकाकडे प्रार्थना करू या. माणूसपणाचे संवेदन जपू आणि जगू या ही शुभकामना व्यक्त करते व सर्वांना इंग्रजी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देते. धन्यवाद.

**डॉ. प्रिया निघोजकर,** कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके



भवतालाचं भान राखत, निरीक्षणं नोंदवत
नाट्यकलेतील सर्जनप्रक्रिया मांडत
एका नाट्यकर्मी-दिग्दर्शकानं लिहिलेलं हे नाट्यचरित्र.
नाट्यकलेविषयी व्यापक दृष्टी देणारं, विविधांगी
अनुभवांचं संचित वाचकांपुढे ठेवणारं हे पुस्तक.

### चंद्रकांत कुलकर्णी सादर करीत आहे...

चंद्रकांत कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)

आजच्या धकाधकीच्या जीवनात मनाला शांतता आणि
समाधान मिळवून देणारं, कृष्णाच्या दैवी रूपापल्याड नेऊन
त्याची कालातीत शिकवण देणारं आणि
प्राचीन परंपरा-वाङ्मयाबद्दल डोळसपण जागवणारं
हे संवादात्मक शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण प्रवासवर्णन.




### नंदीघोष-यात्रा

श्रीकृष्णकथा : वेध नवा

सतीश मुटाटकर, यशवंत मराठे
अनु. डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)




अल्पायुषी ठरूनही रसिकांच्या मनावर आजही
गारूड करणाऱ्या गुरुदत्तवरील ‘चरित्र-कादंबरी-जीवनप्रवास’
अशा संमिश्र घाटाचा, त्याच्या चरित्रातील
नव्या पैलूंवर प्रकाश टाकणारा हा ऐवज.

### प्यासा

सुधीर नांदगावकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी विशेष

## जीवनदर्शी समीक्षक : प्रा. सुधीर रसाळ

*ज्येष्ठ, साक्षेपी समीक्षक सुधीर रसाळ यांना नुकताच साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्या निमित्ताने त्यांच्यासोबतचा डॉ. प्रिया निघोजकर यांनी साधलेला हा वाङ्मयीन संवाद...*

***साहित्यक्षेत्रातील अत्यंत सन्मानाचा असा 'साहित्य अकादमी पुरस्कार' आपणास नुकताच जाहीर झालाय. प्रथमतः त्याबद्दल आपलं हार्दिक अभिनंदन. सर, काय वाटतंय या क्षणी?***

एक तर हा राष्ट्रीय पातळीवरचा पुरस्कार आहे; त्यामुळे तो जणू सर्व भारतीयांकडून मिळाला, असा याला अर्थ येतो. त्यामुळे संपूर्ण देशाकडून आपल्या लेखनाची दखल घेतली गेली अशी अतीव समाधानाची भावना हा पुरस्कार आपल्या मनात निर्माण करतो. दुसरं म्हणजे या पुरस्कारानं तर्कतीर्थ, बा. सी. मर्ढेकर असे अनेक महनीय लेखक-विचारवंत सन्मानित झाले आहेत. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ही संस्था पं. नेहरूंनी स्थापन केलेली असून तिला त्यांनी स्वायत्त रूप दिलं आहे. भारताचे पंतप्रधान असलेले पंडित जवाहरलाल नेहरू या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. या संस्थेच्या सर्वसाधारण सभेत ते दिवसभर हजर राहत आणि या संस्थेचे सदस्य असलेल्या विविध भारतीय भाषांच्या लेखकांबरोबर, राजकारण विसरून काव्यशास्त्रविनोदात रमत असत. या संस्थेची स्वायत्तता त्यांनी कटाक्षानं पाळली. अशा महान व्यक्तीनं निर्माण केलेल्या आणि लोकशाही जीवनपद्धतीचं उदाहरण असलेल्या संस्थेकडून मिळणारं पारितोषिक मला विशेष समाधान देऊन गेलं.

***मराठी साहित्यसृष्टीला ज्यांच्या रूपानं तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला; त्या विंदांच्या अलक्षित, मात्र मौलिक अशा वाङ्मयविषयक सैद्धान्तिक समीक्षेची, तसेच 'जीवनवेधी कला' या सिद्धान्ताची आपण 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथातून दखल घेतलीत आणि याच ग्रंथासाठी आपल्याला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झालाय, हा आनंदयोगच म्हणावा लागेल. याविषयी आपण काय सांगाल?***

मराठीतच नव्हे, तर भारतातील सर्वच भाषांत आपला पाश्चात्त्यांकडून समीक्षासिद्धान्त आयात करण्यावर भर आहे. आपल्या भाषांत सैद्धान्तिक समीक्षाच

निर्माण होत नाही. वाङ्मयकृतीला रूप देणारी आशयसूत्रं आणि समीक्षासिद्धान्त हे सर्वच आपण पाश्चात्त्यांकडून मिळवून आपण आपल्या भाषेत वाङ्मयनिर्मितीचा खेळ करत असतो. अशा परिस्थितीत मराठी समीक्षेत नवे सिद्धान्त कसे निर्माण होणार? अशा प्रतिकूल अवस्थेत मर्ढेकर यांनी लयसिद्धान्त आणि त्यानंतर विंदा करंदीकरांनी जीवनवेधी वाङ्मयकलेचा सिद्धान्त मांडला. मर्ढेकरांच्या सिद्धान्ताची पुरेपूर दखल जरी घेतली गेली असली, तरी विंदांच्या जीवनवेधी कलेच्या सिद्धान्ताकडे मराठी समीक्षकांनी दुर्लक्षच केलं. नागपूरचे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक विवेक गोखले यांनी मर्ढेकर आणि विंदा करंदीकर यांच्या सिद्धान्ताचा तौलनिक अभ्यास सादर करणारा ग्रंथ प्रकाशित केला. अशा परिस्थितीत विंदा करंदीकरांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास करणाराने करंदीकरांच्या एकूण समीक्षेचा आणि जीवनवेधी कलासिद्धान्ताचा विचार करणं स्वाभाविक आहे! दुसरे म्हणजे कुठलाही नवा सिद्धान्त मांडला जाणं हा दुर्मीळ योग असतो. अशा परिस्थितीत जर तो मांडला गेला, तर त्याचं 'वैचारिक' स्वागतच केलं पाहिजे.

तुम्ही त्यांच्या तिसऱ्या ज्ञानपीठ पुरस्काराचा उल्लेख केलात, सिद्धान्त-निर्माता विंदा या पुरस्काराचे हक्कदारच होते.

***अगदी खरंय, सर. विंदा हे कवी म्हणून जनमानसात परिचित आहेत; पण त्यांच्या गद्याचाही असा स्वतंत्र, मूलगामी विचार मांडावा, याचं बीज नेमकं कधी व कसं रुजलं? याचं मर्म काय सांगाल?***

माझा हेतू लेखक-कवीच्या समग्र लेखनाचा चिकित्सक विचार करण्याचा होता. करंदीकर समीक्षक-कवी आहेत. अनेक महत्त्वाच्या वाङ्मयीन प्रश्नांवर त्यांनी लेखन केलं आहे. वाङ्मयीन परंपरा आणि तिच्यात अधूनमधून येणारी नवता, यांच्या नात्याचा तसेच मराठी समाजाच्या अभिरुचीच्या दुभंगलेपणाचा आणि त्याच्या वाङ्मयावर होणाऱ्या परिणामाचा शोध त्यांनी घेतला. केशवसुत, मर्ढेकर यांच्या वाङ्मयाची समीक्षा त्यांनी केली आणि जीवनवेधी कलेचा सिद्धान्तही त्यांनी मांडला. आपण जेव्हा लेखक-कवीचा अभ्यास करतो, तेव्हा तो त्याच्या सर्वच प्रकारच्या लेखनाचा करणं आवश्यक असतं.

***या पुरस्काराच्या रूपानं आता तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये या साक्षेपी समीक्षकांच्या मांदियाळीत आपलाही समावेश झालाय. याविषयी आपल्याला काय वाटतंय?***

तर्कतीर्थांचे आणि माझे जवळचे संबंध होते, त्यांच्या नेतृत्वाखाली मी विश्वकोश समितीवर सहा-एक वर्षं काम केलं. प्रभाकर पाध्ये हे माझे पितृतुल्य मित्र होते. बा. सी. मर्ढेकर हे माझे आवडते आणि मला अनेक वर्षांपासून झपाटून ठेवणारे कवी होते. १९५५पासून म्हणजे मी बीएला असल्यापासून मी मर्ढेकरांच्या कवितेनं

झपाटला गेलो होतो. २०१५मध्ये माझी मर्ढेकरांच्या साहित्यावर तीन पुस्तकं प्रकाशित झाली. तरीही अद्याप हे झपाटलेपण संपलेलं नाही. अशा मला वंदनीय असलेल्या महनीय व्यक्तींच्या पंक्तीत मलाही स्थान मिळालं ही घटना माझ्या दृष्टीनं अतिशय मौलिक आहे.

***सद्य:स्थितीतील समीक्षाव्यवहाराविषयी आपलं काय मत आहे?***

मी समीक्षाव्यवहार या संज्ञेचा दोन पातळ्यांवर विचार करतो. एक म्हणजे प्रत्यक्ष समीक्षालेखनाचं स्वरूप, त्याचा दर्जा आणि दुसरं म्हणजे एकूण ललितवाङ्मयात त्याचं प्रमाण, म्हणजेच किती साहित्यकृतींची, लेखक-कवींची दखल समीक्षेनं घेतली?

आधुनिक मराठी समीक्षा पावणेदोनशे वर्षं वयाची आहे. आधुनिक धर्मनिरपेक्ष, लौकिक साहित्याच्या निर्मितीला सुरुवात झाल्यानंतर तिचा जन्म झाला. तत्कालीन समीक्षकांनी असा विचार केला की भारतीय साहित्यशास्त्र हे नव्या धर्मनिरपेक्ष (सेक्युलर) वाङ्मयाच्या आकलन-मूल्यमापनासाठी अनुपयुक्त आहे. वस्तुतः या लौकिक साहित्याला ते लावून पाहून त्यांनी हा निर्णय घ्यायला हवा होता. त्या वेळी मराठी समीक्षकांनी ॲरिस्टॉटलचा स्वीकार केला. तेव्हापासून समीक्षेचं दान मिळवण्यासाठी आम्ही पाश्चात्त्यांकडे आमचं जे तोंड वळवलं होतं, ते अद्यापही तिकडेच वळलेलं आहे. पाश्चात्त्य समीक्षेचं दान प्रथम ज्याच्या झोळीत पडतं, त्याला मराठी समीक्षकांत अतिशय प्रतिष्ठा प्राप्त होत असते. तेव्हा समीक्षेच्या क्षेत्रात आम्ही 'शून्य' शोध लावला आहे.

कुठलीही कलाकृती समजून घेण्याच्या चिकित्सक प्रक्रियेतून त्या कलाकृतीचं स्वरूप घडवणारी तत्त्वं प्राप्त होत असतात. यातून त्या भाषेच्या कलाकृतीविषयीचे सिद्धान्त तयार होत असतात. मराठी समीक्षेत ही प्रक्रिया घडत नाही. त्यामुळे आपण आयातीवरच अवलंबून असतो.

मराठी समीक्षाव्यवहार केवळ गौणच नव्हे, तर नगण्य झाला आहे. कितीतरी लेखक-कवी अभ्यासले गेलेले नाहीत आणि त्यांचं मूल्यांकनही झालेलं नाही. कवी बी, बोरकर, पाडगावकर, बापट, अनिल, चित्रे, आरती प्रभू, ग्रेस, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे, नाटककार आचार्य अत्रे, वसंत कानेटकर, सतीश आळेकर आणि कितीतरी लेखक. त्यामुळे मराठी वाङ्मयाचं समग्र चित्रच उभं राहत नाही. एकूण चिंताजनक आणि निराशाजनक परिस्थिती आहे.

***सर, पुरस्कार जाहीर झाल्याच्या निमित्ताने आपल्यासोबत हा मुक्त वाङ्मयीन संवाद झाला. समीक्षा व्यवहाराविषयी अगदी परखडपणे आपण मौलिक विचार मांडलेत. आपणास मन:पूर्वक धन्यवाद.***

❖

## ‘राजहंसी’ विविधा




भारताच्या सहा शेजारी देशांतील ठरावीक व्यक्तींना भारताचे नागरिकत्व ज्या कायद्याने मिळू शकते, त्या नव्या कायद्याच्या विविध पैलूंचा वेध घेणारे -

### नागरिकत्व दुरुस्ती कायदा

घटनात्मकता व वास्तवता

शेषराव मोरे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

आज परिवर्तनाच्या चळवळी कुंठित झाल्याचे चित्र दिसते. अशाच शोधयात्रेत राजीव साने केवळ चिकित्सा करून थांबले नाहीत, तर स्वतंत्र नीतिशास्त्राच्या उभारणीची गरज त्यांनी ओळखली. भविष्यातील आवश्यक अशा विचारमंथनाच्या दिशेने जाणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल असे पुस्तक.

### स्फूर्तिवादी नीतिशास्त्र

राजीव साने

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ५०)







‘नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण’ यंदापासून अमलात येतंय, अशा वेळी शिक्षणातल्या सगळ्या घटकांना पडणाऱ्या प्रश्नांची नेमकी उत्तरं देणारं, शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलेलं मोलाचं पुस्तक.

### नवे शैक्षणिक धोरण

विद्यार्थी-पालकांसाठी मार्गदर्शन

प्रा. डॉ. नितीन करमळकर । मंगला गोडबोले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)

# शास्त्रशुद्ध, तर्कशुद्ध आणि ताठ कण्याचा व्रतस्थ अभ्यासक

*ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना जागतिक प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन ऑफ दि अर्थ' हा पुरस्कार जाहीर झाला आहे, त्या निमित्ताने...*

'झुकेगा नही सालाऽऽ' हा 'पुष्पा' चित्रपटातील संवाद सध्या प्रचंड लोकप्रिय आहे. 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅम'तर्फे प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन्स ऑफ दि अर्थ' हा पुरस्कार या वर्षी ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना जाहीर झाला, तेव्हा नेमके हेच मनात आले. खुद्द डॉ. गाडगीळ यांनी या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त करताना 'आपण कोणत्याही प्रकारच्या दबावाखाली न येता व वस्तुनिष्ठ अभ्यास व तर्कशुद्ध मांडणी यांच्याशी फारकत न घेता आयुष्यभर काम केले' याचा जाणीवपूर्वक उल्लेख केला आहे. छोट्या- मोठ्या मोहांना बळी पडणाऱ्या विद्वानांची देशभरच नव्हे तर जगभर रेलचेल असताना व्रतस्थपणे शाश्वत विकासाचा विचार लोकांसोबत राहून मांडणारे डॉ. गाडगीळ यांच्यासारखे शास्त्रज्ञ हे सन्माननीय अपवाद! पर्यावरणासारख्या क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्येही जहाल आणि मवाळ, असे दोन गट सुरुवातीपासून आहेत. जहाल गटातील कार्यकर्ते डॉ. गाडगीळ यांची संभावना 'मवाळ' अशी करत आले आहेत.

नोव्हेंबर १९८७ ते फेब्रुवारी १९८८ यादरम्यान सहा राज्यांमध्ये शंभर दिवसांची 'पश्चिम घाट बचाव' मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेसाठी ख्यातनाम मानववंश-शास्त्रज्ञ डॉ. के. सी. मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सल्लागार समिती गठित करण्यात आली होती. पश्चिम घाटाची पर्यावरणीय स्थिती आणि या घाट परिसरात राहणाऱ्या लोकांचे जीवन याबाबतचे वास्तव जाणून घेण्यासाठी 'चिपको' आंदोलनाचे चंडीप्रसाद भट, सुंदरलाल बहुगुणा तसेच डॉ. माधव गाडगीळ यांच्या सल्ल्याने कोणती माहिती स्थानिक लोकांशी बोलून संकलित करायची याबाबतची प्रश्नावली व नमुने तयार करण्यात आले होते. सहा राज्यांतील सुमारे एकशे साठ संघटनांचा या मोहिमेत सहभाग होता. पंच्याण्णव दिवस पश्चिम घाट पायाखाली तुडवत कार्यकर्त्यांनी सुमारे सहाशे वाड्या-वस्त्यांमधील रहिवाशांशी संवाद साधून नोंदी केल्या. कन्याकुमारीतून निघालेला जथा व महाराष्ट्राच्या खान्देश भागातील नवापूर येथून निघालेला जथा हे दोन्ही जथे गोव्यात रामनाथीला पोहोचले. अहवाल निश्चितीच्या चर्चेत डॉ. गाडगीळ बोलत असताना

जहाल गटाचे कार्यकर्ते अस्वस्थ झाले. त्यांना शास्त्रीय पायावरील मूलभूत मांडणी ऐकण्यात रस नव्हता, त्यांना आक्रमक कृती-कार्यक्रम हवा होता. डॉ. गाडगीळ शांतपणा ढळू न देता मांडणी करत राहिले. काही जहाल कार्यकर्ते यावर बैठकीचा बहिष्कार करत बाहेर पडले.

डॉ. गाडगीळ यांनी प्रश्न मांडताना नेहमीच जमिनीवर पाय ठेवून शास्त्रशुद्ध, वस्तुनिष्ठ व तर्कशुद्ध मांडणी केली. डॉ. गाडगीळ यांचा लोकशाही विकेंद्रीकरणावर ठाम विश्वास आहे. साहित्यातील दर्दी असल्याने मराठी साहित्यातील काव्यात्म संदर्भ देत सोप्या मराठीमध्ये ते पर्यावरणासारखा व जीवशास्त्रासारखा विषय सामान्य माणसापर्यंत पोहोचवू शकतात. पर्यावरणाचा व लोकांचा विचार न करता शासन व प्रशासनाने धोरणे निश्चित केली तर त्याचे दुष्परिणाम भोगावेच लागतात, हे डॉ. गाडगीळ ठामपणाने सांगतात. केरळमधील वायनाडची दुर्घटना असो की महाराष्ट्रात दरडी कोसळून जीवित व वित्तहानी घडण्याचे प्रकार असोत; डॉ. गाडगीळ या आपत्तींची कारणे पुन:पुन्हा सांगत आहेत. केवळ जास्त पाऊस हे यामागील कारण नाही, तर विकासाच्या नावावर संपूर्ण पश्चिम घाट आपण खिळखिळा केला आहे. बेबंदपणे डोंगराळ भागात रिसॉर्ट्स उभारून श्रीमंत पर्यटकांसाठी त्यात कृत्रिम जलतरण तलाव केले जात आहेत. खाणी, बोगदे यांचा मोह अजूनही सुटत नाही. अशा बाबींमुळेच २०१३ साली डॉ. गाडगीळ समितीने पश्चिम घाट संरक्षण व संवर्धनासाठी उपाय सुचविणारा जो अहवाल दिला, तो बासनात गुंडाळून ठेवण्यात आला. नव्याने डॉ. कस्तुरीरंगन समिती नेमली, पण तिचा विसविशीत अहवालही सत्ताधाऱ्यांना गैरसोयीचा वाटला. अजूनही पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील या श्रेणीत घातलेली पश्चिम घाटातील गावे आणि वाड्या-वस्त्या या श्रेणीतून वगळण्यासाठी आटापिटा सुरूच आहे.

या सगळ्या घडामोडी घडत असताना डॉ. माधव गाडगीळ यांनी आपली भूमिका बदलावी, काही बाबतीत तडजोडी कराव्या, असे दडपण डॉ. गाडगीळ यांच्यावर अनेकदा आले; पण अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचा हा मुलगा वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षीदेखील पाठीचा कणा ताठ ठेवून आहे. आणि म्हणूनच डॉ. गाडगीळ 'चॅम्पियन्स ऑफ दि अर्थ' या पुरस्कारास सर्वार्थाने पात्र आहेत. तरुणांनी त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवायला हवा!

**_उदय कुलकर्णी_**

_'दै. लोकमत'मधून साभार_

❖

# मन:स्थिती बिघडवून टाकणारा कवितासंग्रह ‘युद्धानंतर...’

*मराठी कवितेने प्रथमच विचारलेले काही प्रश्न म्हणजे ‘युद्धानंतर...’.*
*या कवितासंग्रहाविषयी...*

मन:स्थिती बिथरवून टाकणारा हा सध्याचा काळ आहे. आणि त्याला शब्दांमध्ये पकडणारा आदित्य दवणेचा ‘युद्धानंतर...’ हा सध्याच्या नव्यांच्या अनेक कवितासंग्रहांमधला मन:स्थिती बिघडवून टाकेल असा संग्रह आहे.

*केवळ बातमीचा*
*अनुवाद केल्यानंतर*
*तिची कविता होते*
*हे खरंच किती भयंकर आहे!*

अशा साध्या शब्दांमध्ये, वर्तमानाचं विद्रूप आणि हल्लेखोर दर्शन कवी घडवतो. खड्डे खणून त्यात डंपरने मुडदे सोडून देणारे ‘कामगार’ ‘उद्याही मिळेल काम’ अशी आशा उराशी बाळगताना दिसतात; याचा अर्थ असा की ही युद्धे कधी थांबणार याची कोणतीही हमी हा काळ देऊ शकत नाही.

*एका दु:खद घटनेसाठी*
*जगभर निघतात*
*चांगल्या माणसांचे*
*कॅन्डल मार्च!*
*बहुधा मागणी वाढेल*
*मेणाची*
*येत्या काही दिवसात...*

याचाही अर्थ असाच आहे की युद्धामुळे घडणाऱ्या दु:खद घटना रोज घडत राहणार आहेत, एवढी त्यांची तीव्रता जगभर वाढलेली आहे.

धार्मिक ध्रुवीकरण आणि आर्थिक सत्तेची चढाओढ हातात हात घालून या काळात वावरते आहे आणि डावे असोत की उजवे; त्यांची प्रतिपादने ही प्रायोजित केल्यासारखी वाटत आहेत. म्हणूनच कवी ‘डावे- उजवे’ या कवितेमध्ये एक सार्वत्रिक पराभूतता व्यक्त करताना म्हणतो की -

अभिनंदन!

## पुणे मराठी ग्रंथालय



कै. ना. ह. आपटे
स्मृती पुरस्कार

**सह्याचला आणि मी एक प्रेमकहाणी**

◆

माधव गाडगीळ



अभिनंदन!

## साहित्य विहार संस्था, नागपूर



राज्यस्तरीय विशेष उल्लेखनीय
काव्यसंग्रह पुरस्कार २०२४

**आतून उगवलेल्या कविता**

◆

प्रा. प्र. द. कुलकर्णी



अभिनंदन!

## आनंदयात्री वाङ्मय मंडळ, वेंगुर्ला



कै. पार्वती रामचंद्र रायकर
स्मृती पुरस्कार

**मोगलाई**

◆

विलास शेळके



*उदारमतवादी, पुराण मतवादी*
*समाजवादी, राष्ट्रवादी हे सारेच दगावलेत आत्तापर्यंत युद्धात, फक्त त्यांच्यातला...*
*(आपल्याला वाटतं की एखादा तरी वाचला असेल. पण -)*
*नाही, सारेच दगावलेत!*

इथे 'नाही, सारे दगावलेत' याच्या आधीचा जो पॉज आहे तीच एक हादरवून टाकणारी अशी अप्रतिम अव्यक्त कविता आहे.

'चित्रकलेचे तास' ही कविता तर अंगावर सर्रकन भयंकर भीतीचा काटा आणते. संपूर्ण लाल रंगवलेला कागद म्हणजेच सफेद फरशीवर पडलेला रक्तसडा, अशी कल्पना या कवितेत साकार होताना, त्या घरातील लहान मुले, स्त्रिया, वृद्ध आणि तरुण अशा सर्वांच्या एकामागून एक हत्या होताना आपण बघतो.

हा कवी युद्धाबद्दलची फक्त चिंता व्यक्त करत नाही किंवा युद्धखोरीवर टीका करून थांबत नाही, तर आपल्या मनात युद्धखोर वृत्ती किती खोलवर भिनलेली आहे याचा शोध घेताना दिसतो. आणि म्हणूनच -

*माझ्यातले युद्ध मला*
*कुठे घेऊन जात आहे?*

हा त्याचा प्रश्न आपल्यालाही काळामागून फरफटवीत नेतो, ओरखडे काढतो.

रक्तबंबाळ करून टाकणारी ही तीव्र अंतर्मुखता ही आदित्य दवणे या नव्या कवीची ताकद आहे.

**महेश केळुसकर**


भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरण
यांतून निर्माण झालेल्या शोषणाच्या
नवनव्या तऱ्हांनी बरबटलेला
जडशीळ भोवताल पेलता पेलता
घायाळ झालेला समकाळ म्हणजे
'खांदे सुजलेले दिवस' हा कवितासंग्रह.



## खांदे सुजलेले दिवस

अशोक कोतवाल

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

अभिनंदन!

## विदर्भ साहित्य संघ, नागपूर



य. खु. देशपांडे स्मृती शास्त्रीय लेखन पुरस्कार

**माणूस 'असा' का वागतो?**

◆

अंजली चिपलकट्टी




---



अण्णासाहेब खापर्डे स्मृती आत्मकथन

**विवाह नाकारताना**

◆

विनया खडपेकर




---



शतकोत्तर द्वितीय वर्ष विशेष पुरस्कार

**वाणी आणि लेखणी**

◆

दिलीप माजगावकर



अभिनंदन!

## विदर्भ साहित्य संघ, नागपूर

राज्यस्तरीय स्व. गोपाळराव मुकुंदराव देशपांडे (सोनाटकर) संपादन पुरस्कार

**वाङ्मयीन युगान्तर आणि श्री.पु. भागवत**

◆

सुधीर रसाळ आणि वसंत पाटणकर








---



बा. रा. मोडक स्मृती बालसाहित्य लेखन पुरस्कार

**१६९५ स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब**

◆

सुरेश वांदिले



## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




शिष्य, मैफलगायक, संगीतकार आणि गुरू
ही त्यांची संगीतविश्वातील चार रूपं.
यात अव्वल असण्याची त्यांची आंतरिक ऊर्मी!
यातून खूप काही घडत गेलं. या प्रवासाचा वेध

### अभिषेकी

पं. जितेंद्र अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

शैला मुकुंद

किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. ₹ ५०)

हिंदुत्व परिवार व मार्क्सवादी परिवार शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा, कार्याचा तसेच गेल्या १०० वर्षांतील भारताचे समाजकारण आणि राजकारण यांच्यावर झालेल्या त्यांच्या परिणामांचा तटस्थ व निष्पक्षपाती भूमिकेतून घेतलेला हा मागोवा.

### हिंदुत्व, मार्क्सवाद आणि भारत

विजय आपटे

किंमत : ₹ १०००/- । (ट.ख. ₹ ५०)







कवितेवर प्रेम करणाऱ्या एका कविमनाचा कवितेसोबतचाच हा भावविभोर करणारा, तर कधी अंतर्मुख करणारा प्रवास.
'माझी कविता माझ्यासाठी' असं म्हणणाऱ्या
या मनस्वी कवीची कविता वाचता-वाचता कधी आपली होऊन जाते हा अनुभव घ्यायलाच हवा!

### दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता

दत्तप्रसाद दाभोळकर

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# विनोबा

*विनोबा भावे यांना १९८३ साली ‘भारतरत्न’ या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. भ. ग. बापट लिखित ‘विनोबा’ हे पुस्तक ‘राजहंस’ने प्रकाशित केले. त्यातील हा संपादित अंश.*

विनोबांचे गीता-चिंतन आजीव चालू होते. ‘मी गीतेविषयी इतरांशी कधी बोलतो तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो, आणि एकटा असतो त्या वेळेस त्या अमृतसमुद्रात खोल बुडी मारून बसतो.’

त्यांच्या गीता-चिंतनाची पहिली फलनिष्पत्ती म्हणजे ‘गीताई’. गीताईचा जन्म एका आश्रमवासीयाच्या विनंतीच्या नुसत्या निमित्ताने झाला. ‘संस्कृत आम्हांला समजत नाही. आम्हांला मराठी गीता असल्यास किती बरे वाटेल!’ हा उद्‌गार विनोबांच्या अंत:करणात घर करून होता. त्यांची आई व्यंकटेश स्तोत्र, शनिमाहात्म्य, भक्तिमार्गप्रदीप वाचत असे, पण मराठी गीता वाचण्याची इच्छा असूनही तिला ती मिळाली नाही. ही गोष्ट आचार्यांच्या अंत:करणात खोलवर रुतून बसली होती. त्यांना एकदम तो प्रसंग आठवला.

‘ती १९१५ सालातली गोष्ट. बडोद्यात एक प्रवचनकार आले होते. ते गीतेवर प्रवचने करीत असत. आई रोज रात्री त्यांची प्रवचने ऐकायला जायची. दोन-चार दिवसांनी ती म्हणाली, “विन्या, ते गीतेवर बोलतात. मला समजत नाही. मला एक गीतेवर मराठी पुस्तक आणून दे.” त्या काळात द्रवीडशास्त्र्यांचे मराठी गद्य अर्थाचे गीतेचे पुस्तक उपलब्ध होते. ते अडीच आण्याला विकत मिळायचे. ते पुस्तक मी आईला आणून दिले. ते वाचून ती म्हणाली, “हे पुस्तक गद्य आहे. मला पद्य आणून दे.” गद्याहून पद्य वाचायला तिला सोपे पडत असावे. वामन पंडितांचा गीतेचा समश्लोकी अनुवाद उपलब्ध होता. ते पुस्तक आईला आणून दिले. थोड्या दिवसांनी ती म्हणाली, “हे कठीण आहे. समजत नाही.” मी म्हटले, “आता काय करू? त्याहून सोपा अनुवाद दुसरा नाही.” ती झटकन म्हणाली, “तूच का करत नाहीस

माझ्यासाठी गीतेचा मराठीमध्ये सोपा अनुवाद? तू हे काम करू शकतोस.'' आईच्या या विश्वासानेच माझ्याकडून गीताईची रचना घडवली आहे.'

विनोबांच्या एका व्याख्यानातील वरील उताऱ्यावरून गीताईच्या भाषांतराची केवढी पूर्वतयारी होती, हे लक्षात येते. 'आधी आचार्यांनी आईपासून परमार्थाचा लाभ करून घेतला. नंतर ज्ञानानुभवाने सिद्ध अशा ज्ञानेश्वरीपासून गीता समजून घेतली. तुकाराम महाराजादी अनेक संतांचा ग्रंथाद्वारे सत्संग साधला. त्यानंतर निष्काम कर्माचा मूर्तिमंत पुतळा अशा महासंत महात्मा गांधींचा प्रत्यक्ष आणि गाढ सहवास आचार्यांनी प्राप्त करून घेतला. त्याचप्रमाणे शंकराचार्य-टिळकांसारख्या अनेक महाबुद्धिमान भाष्यकारांची भाष्ये मननपूर्वक अभ्यासली. शेवटी स्वत: अत्यंत कसोशीने सतत गीतेबरहुकूम आचरण राखण्याचा प्रयत्न केला आणि तद्नंतरच हे गीताईचे अवतरण झाले.'

ही अशी पूर्वतयारी मनात होत होती. कारणे परिपक्व झाल्यावर कार्यनिर्मिती अटळपणे व्हायचीच. जगातील अमर साहित्याची निर्मिती अशीच झालेली दिसते. गीताईची निर्मिती त्याच कुळीची.

गीतेचे हे भाषांतर सतत चार महिने चाललेले होते. गीताई लिहीत असताना विनोबांची मानसिक अवस्था कशी होती? ते म्हणतात, ''ज्या वेळी हे भाषांतर मी लिहीत होतो त्या वेळी मी स्वत:मध्ये शिल्लक राहिलो नव्हतो. पहाटे एकाग्र होऊन ठरलेल्या वेळात मी लिहीत असे. परंतु लिहिताना गीतेशिवाय जगात काही आहे याचे लेशमात्र भान उरत नसे. ६ ऑक्टोबर १९३०पासून ६ फेब्रुवारी १९३१ या चार महिन्यांत दुसरा विचारही मनाला शिवला नाही. गीतार्थाशिवाय अन्य चिंतन नाही. मला स्वत:ला अलग करून मी हे भाषांतर केले आहे.'' गीताई-रचनेचा उपक्रम अगदी





एका सच्च्या समाजवाद्याचं उदास, चिंतनशील स्वगत.
अनेक अंतर्विरोधांनी ग्रासलेलं भारताचं बहुआयामी
समाजजीवन चंद्रशेखरांनी पुस्तकात सजीव केलंय.
पुस्तकात चंद्रशेखर म्हणतात,
'राजकारण सत्यावर चालत नाही हेच खरं.'
**- अंबरीश मिश्र**

चंद्रशेखर
जसं जगलो तसं

अनुवाद : अंबरीश मिश्र

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

जवळून मोठ्या जिव्हाळ्याने पाहणारे शिवाजीराव भावे लिहितात, ‘पहाटेचा अतिशय पवित्र काळ, सत्याग्रहाश्रमासारखे पुण्यस्थळ, आधीच एकांतात असलेल्या आश्रमाच्या इमारतीतील अगदी शेवटचा, एकांताने पूर्ण असा हॉल, त्या जागी अतिशय स्वच्छता आणि मोकळेपणा, समोरच उषःकाल आणि सूर्याचे संपूर्ण दर्शन उभे, काळ्याभोर घोंगडीवर गीतेचीच पुस्तके विराजमान झालेली आणि त्याच गीतेच्या मेळात देहभान विसरून आचार्य हे भाषांतर लिहीत आहेत हा देखावा त्या वेळी रोज आश्रमीयांना दिसून येत असे. लिहिता-लिहिता मध्येच आचार्य हॉलमध्ये फेऱ्याही घालत. या प्रदक्षिणांनी गीताईच्या मूर्तीचे आचार्यांना अधिकाधिक स्पष्ट दर्शन होई. आणि ते दर्शन वहीमध्ये उतरले जाई.’




किंमत : ₹ ३००/- । (ट.खु.₹ ५०)

गीतेचे भाषांतर विनोबांनी सलग म्हणजे पहिल्या अध्यायापासून अठराव्या अध्यायापर्यंत असे केलेले नाही. त्याची सुरुवात पाचव्या अध्यायाच्या भाषांतरापासून झालेली आहे. याला कारणही फार महत्त्वाचे आहे. एखाद्या गोष्टीचा स्वतःला पूर्ण उलगडा, पूर्ण दर्शन झाल्याशिवाय त्या गोष्टीवर काही लिहायचं नाही, असा विनोबांचा शिरस्ता होता.

पूर्ण एकाग्र चित्ताने सतत गीताचिंतन साध्य झाल्यामुळे गहन समजल्या जाणाऱ्या भगवद्गीतेचा सहजसुंदर, मधुर शब्दांत, मूलार्थाला धक्का न लागू देता, काही ठिकाणी तर मूलार्थ अधिक अर्थवाही शब्दांत गुंफून, ‘गीताई’ हे भाषांतर मराठी भाषेचे अप्रतिम लेणे झाले आहे. गीतेची आज मराठीत अनेक भाषांतरे उपलब्ध आहेत. इतके असूनही गीतेची नवनवीन भाषांतरे होत राहतील, त्यांचेही स्वागत होईल, असे नम्रपणे विनोबा सुचवतात. सौंदर्य तेच, की जे पाहून आपल्याला ते सकलपणे समजलेय असा गर्व पाहणाराला होत नाही, उलट ते सौंदर्य शब्दांत, रंगांत, रेषांत सामावून ठेवणे म्हणजे निरभ्र निळ्या आकाशाला मर्यादित करणेच असते. कुणालाच ते शक्य नसते. कारण सौंदर्याचे स्वरूपच तसे असते, ते नित्यनूतन असते.

गीताई वाचत असताना एक गोष्ट सहज लक्षात येते की, तिच्या रचनेवर ज्ञानेश्वरांचा प्रभाव पुष्कळच आहे. शांकरभाष्याचा परिचय असणाऱ्यांना त्यात शंकराचार्यांच्या विवेचनाचा प्रभाव आहे, हे जाणवते. यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. विनोबांनी अनेक ठिकाणी उल्लेख केलेला आहे की, शंकराचार्य आणि ज्ञानेश्वर

यांचा आपल्या वैचारिक जडणघडणीत मोठा वाटा आहे. त्यांनी स्पष्टच म्हटलेय की, ‘जीवनात करण्यासारखे जे सुचले त्यात अधिकाधिक मदत मला, शास्त्रग्रंथ सोडून दिले तर, शंकराचार्य, ज्ञानदेव आणि गांधीजी या तिघांकडून मिळाली आणि त्यांनी जी सेवाकार्ये उभी केली त्यांतील काही सेवाकार्ये उभी करण्यात माझे तारुण्यातील जीवन गेले. संगती, विचारांचा लाभ आणि तदनुसार काम करण्याची संधी ही तिन्ही मिळून ‘महापुरुषसंश्रय’ होतो. तो मला प्राप्त झाला. त्यांचे माझ्यावर फार उपकार आहेत. कारण ज्या दार्शनिक शंका तार्किक मनात उठू शकतात त्या माझ्या मनातही उठू शकत होत्या. त्यांचे निरसन करण्यात शंकराचार्यांची अधिकाधिक मदत झाली. ज्ञानदेवांचे माझ्यावर जे उपकार आहेत, त्याचे वर्णन करण्यासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत. ते माझ्या चिंतनावर आहेत, माझ्या हृदयावर आहेत आणि कार्यपद्धतीवरही आहेत. मी एक ओबडधोबड दगड आहे. या दगडाला शंकराचार्यांनी मजबूत पक्के केले. या दगडाला गांधीजींनी कारागिरी करून आकार दिला, पण या दगडाला फोडून त्यातून पाणी काढण्याचा पराक्रम कोणी केला असेल, माझे जीवन आणि हृदय यांना मधुरता कोणी प्राप्त करून दिली असेल, तर ती ज्ञानेश्वरमहाराजांनीच.’

शंकराचार्यांचा आणि ज्ञानेश्वरांचा प्रभाव गीताईवर, त्यातील शब्दांवर, शब्दार्थांवर पडलेला आहे. पण त्या दोघांची शब्दरत्ने विनोबांनी जशीच्या तशी घेतली नाहीत. त्या शब्दरत्नांना त्यांनी आपल्याला हवे तसे पैलू पाडले. ते त्यामुळे खास विनोबांचे शब्द झाले आणि त्यांच्या लेखनशैलीचे अर्थगांभीर्य त्यांनी वाढवले.

❖





बाईच्या संघर्षमय जगण्याचं चित्रण
मराठी कादंबरीला नवं नाही. पण बायकांचा समूह
मात्र क्वचितच कोणी रंगवला...
एका लहानशा खेड्यातला बायकांचा समूह ओघवत्या
भाषेत नि चित्रमय शैलीत रंगवणारी कादंबरी...

बाय गं...
सामान्य स्त्रीचे सामान्य जनजीवन

विद्या पोळ - जगताप

किंमत : ₹ ४८०/- । (ट.ख. ₹ ५०)

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. आपला मराठी साहित्य ठेवा विपुल व समृद्ध आहे. मराठी भाषक आणि वाचक हेच भाषेचे वाहक आहेत. यासाठीच या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे या सदराच्या माध्यमातून अंशरूपाने वाचकांच्या समोर ठेवत आहोत. अखेर... 'पिंडी ते ब्रह्मांडी!' लेखमालेतील या पहिल्या लेखात कविवर्य कुसुमाग्रज तथा नाटककार वि. वा. शिरवाडकर यांनी व्यक्त केलेल्या मराठीविषयक चिंतनाचा हा संपादित अंश....*

महाराष्ट्राच्या अस्मितेचा, आधुनिक युगातील विकासाचा प्रश्न म्हणून भाषेचा विचार व्हायला हवा. परभाषेच्या कुबड्या लावून कोणताही समाज प्रगतीच्या शिखराकडे वाटचाल करू शकत नाही. इंग्रजीवर एक संपन्न भाषा म्हणून माझंही प्रेम आहे. जगातील ज्ञानविज्ञानाशी संपर्क साधणारी ती एक खिडकी आहे, हे सुभाषित मलाही मान्य आहे. पण खिडकी म्हणजे घर नव्हे. आपण घराच्या चार भिंती न बांधता, फक्त खिडक्याच उभ्या करीत आहोत. कोणतीही भाषा माजघरात किंवा बाजारात वाढत नाही. ज्ञानविज्ञानाच्या, राज्यकारभाराच्या, आर्थिक व्यवहाराच्या प्रांतात तिचा प्रवेश झाला तरच ती वाढू शकते आणि तशी ती वाढते हे अनेक राष्ट्रांनी सिद्ध केलेलं आहे. आपण कल्पनेची कुंपणं निर्माण करीत आहोत आणि एका परस्थ भाषेच्या पायावर डोकं ठेवून 'तूच आम्हाला तार,' म्हणून तिला विनवणी करीत आहोत. भाषाविषयक समस्या सोडविणं सोपं नाही हे तर खरंच, पण अवघड प्रश्न कपाटात अधिक अवघड होत जातात आणि शेवटी संभाव्य उत्तरंही गमावून बसतात. हा प्रश्न केवळ स्वभाषेच्या महतीचा किंवा भावनात्मक अभिमानाचा नाही. अवास्तव, पारंपरिक अभिमानाला जिथं थारा नाही त्या रशियाचा नेता, मोटारचं दार उघडणाऱ्या द्वारपालालाही 'थँक यू' न म्हणता रशियन भाषेतच त्याचे आभार मानतो हे आपण

पाहिलेलं आहे. भाषेचा प्रश्न हा केवळ अभिमानाचा प्रश्न नसून तो समाजाच्या अस्मितेचा आणि पर्यायानं अस्तित्वाचाही प्रश्न आहे. समाजाच्या परिवर्तनाची वा क्रांतीची पेरणी ही स्वभाषेच्या किनाऱ्यावरच होऊ शकते, हे क्रांतिकारकांच्या नेत्यांनीही सांगितले आहे. मी इंग्रजी भाषेचा द्वेष करत नाही. केवळ जागतिक साहित्याचेच नव्हे तर जगातील ज्ञानविज्ञानाचे दरवाजे इंग्रजीनंच आमच्यासाठी उघडले आहेत. भूतकाळात रुतलेल्या या समाजाला आधुनिकापर्यंत इंग्रजीनं पोचवलं आहे. नव्या मनूची नवी मूल्यं तिनंच येथे पेरली आहेत. बोलण्यालिहिण्यात इंग्रजी शब्द येऊ नयेत, इंग्रजी संज्ञांना भाषिक व्यवहारात प्रवेश देऊ नये, वा कोणत्याही स्तरावर इंग्रजीचा अभ्यास वर्ज्य असावा, असा रांगडा अभिमान अयोग्यच मानायला हवा. भाषा अशी बंदीखान्यात वाढत नाही. आजही जी मराठी प्रचलित आहे, तीही अनेक भाषांतील शब्दांचे आणि व्यावहारिक संज्ञांचे नजराणे घेऊनच संपन्न झाली आहे. कोणत्याही जिवंत समाजाची भाषा तळ्यासारखी साचीव नसते, तर कालमानानं निर्माण होणाऱ्या नव्या ज्ञानाचे, विचारांचे, जाणिवांचे पाझर आत्मसात करत पुढे जाणाऱ्या नदीसारखी प्रवाही असते. इतर प्रगत भाषांशी संपर्क ठेवूनच ती प्रगती करू शकते. शुद्धतेच्या कर्मकांडात रुतलेल्या आणि त्यामुळेच प्रगतीला पराङ्मुख झालेल्या भाषा मृत या सदरात कशा जमा होतात, हे इतिहासानं दाखवलेलं आहे. हे भान मराठीनं आपल्या पंधरा शतकांच्या प्रवासात राखलेलं आहे आणि म्हणूनच नव्या युगाची आव्हानं पेलण्याचं सामर्थ्य तिच्या ठिकाणी आलं आहे. भाषा समर्थ आहे, पण तिच्या सामर्थ्यासंबंधी साशंक असलेली आम्ही तिची अपत्यं मात्र दुबळी आहोत. तेव्हा आमचं वैर कोणत्याही भाषेशी नाही आणि मावशीच्या मायेनं आमचं पालन करणाऱ्या इंग्रजीशी तर नाहीच नाही. मावशीबाईनं आता आईच्या घराचा कब्जा पुन्हा आईकडे द्यावा एवढीच आमची मागणी आहे. म्हणून आपल्यासमोर प्रश्न आहे तो इंग्रजीच्या बहिष्काराचा नाही, तर मराठीच्या संरक्षणाचा आणि संवर्धनाचा आहे.

भाषा म्हणजे संकलन नव्हे. समाजाचं वैचारिक आणि जाणिवात्मक संचित काळातून पुढे नेणारी आणि परिणामत: समाजाच्या बदलत्या जीवनाला अखंडता, आकार आणि आशय देणारी भाषा ही एक महाशक्ती असते, सूत्रात ओवलेल्या मण्यांप्रमाणे समाजजीवनाच्या साऱ्या धारणा आणि विकासाच्या प्रेरणा तिच्यात ओवलेल्या असतात. म्हणून मराठीवरील संकट हे तिच्या शब्दकोशावरील वा साहित्यावरील संकट नाही. ते महाराष्ट्राच्या अस्मितेवरील, मराठीपणावरील आणि येथील लोकांच्या भवितव्यावरीलही संकट आहे. मुंबईत म्हणजे महाराष्ट्राच्या राजधानीत मराठीचं स्थानं कोणतं हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे. मुंबई हे सर्वाश्रयी शहर आहे. विविध प्रांतांतील लोक येथे येतात, राहतात, याचा आम्हाला अभिमान, आनंद वाटतो. पण मुंबईतील मजलेदार इमारती - त्या बांधणारे वा त्यात राहणारे कोणीही असोत त्या मराठी मातीवर उभारलेल्या आहेत. मुंबई ही महाराष्ट्रातील मराठी

भाषिकांची जीवनधात्री माता आहे. या माउलीच्या वत्सल सावलीत कोणीही यावं, राहावं, निर्वाहसाधना करावी - अवश्य. ‘हे विश्वचि माझे घर’ हा संतांचा संदेश या मातीत रुजलेला आहे. पण आठ कोटींच्या या आईला धनसत्तेच्या बळावर आपली बटीक करण्याचा प्रयत्न कोणी करू नये. मंत्रालयात जाऊन मंत्र्याशी वा मुख्यमंत्र्याशी आपण मराठीत बोलू शकतो. पण कोणत्याही हॉटेलात वेटरशी वा दुकानातील विक्रेत्याशी आपल्याला हिंदीत वा इंग्रजीत बोलावं लागतं - ही परिस्थिती शोचनीय आहे. कलकत्ता, मद्रास ही शहरंही सर्वाश्रयी आहेत. पण तेथील बहुतांश व्यवहार बंगाली, तामीळ भाषेतच चालतात. मुंबईमध्ये वावरताना मात्र हे शहर महाराष्ट्रात आहे की उत्तर प्रदेशात वा इंग्लंडमध्ये आहे, असा संभ्रम निर्माण होतो. ही परिस्थिती बदलायची असेल तर हे क्षेत्र दुकानदारीचं, हे व्यापाराचं, हे कारखान्याचं असं म्हणून नाक उडवणं योग्य होणार नाही. भाषेचा चौरस विकास व्हायचा असेल, बोलभाषा म्हणून तिला माजघरात ढकलायचं नसेल तर सामाजिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत तिचा प्रवेश व्हायला हवा. महाराष्ट्रात असलेल्या प्रत्येक व्यवहाराशी होणारा शासकीय आणि निमशासकीय संवाद जर मराठीतून झाला तर ही परिस्थिती हलकेहलके सुधारण्याची शक्यता आहे.

जगातील सर्व प्रगल्भ भाषांना जे साधलं ते मराठीलाही साधता येईल. फक्त आपला विश्वास हवा, अमृताशीही पैजा जिंकणाऱ्या आपल्या मायमराठीवर. आज मराठी संकटग्रस्त असली तरी उद्या परवा तिला आपला रास्त अधिकार आणि गौरव प्राप्त होईल, यात मला शंका वाटत नाही. आपल्या व्यवहाराचा नाही, पण आपल्या प्रेमाचा आधार तिला आज आणि उद्याही हवा आहे. तो मिळेल असा विश्वास व्यक्त करून मी पुन्हा एकदा आपणा सर्वांना धन्यवाद देतो.

*(साभार, ‘मराठीचिये नगरी’, वि. वा. शिरवाडकर, नवचैतन्य प्रकाशन)*

❖

नवीन कल्पनांचा झरा कुठेही फुटू शकतो. विद्यार्थी, गृहिणी, शेतकरी, आदिवासी आणि अगदी अशिक्षित माणूस असं कोणीही ज्ञान-विज्ञानात भर घालू शकतो, हे दाखवून देणाऱ्या ‘कट्टा’ प्रयोगशाळेचं हे विलक्षण अनुभवकथन.



कट्टा मॉडेल

डॉ. मिलिंद वाटवे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

## ‘राजहंसी’ विविधा



ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का? परतीची वाट सापडते का?

### डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

विंदांनी केलेल्या काव्यारूपांच्या अनेक प्रयोगांनी मराठी काव्यक्षेत्र समृद्ध झाले. विंदांच्या काव्यवैशिष्ट्यांची सांगोपांग आणि मार्मिक मीमांसा करणारा; काव्यरसिकांना, काव्याच्या अभ्यासकांना निश्चितच उपयुक्त ठरणारा ग्रंथ -

### कवितायन

सुधीर रसाळ

किंमत : ₹ ४९०/- । (ट.ख. ₹ ५०)







निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील भावनाट्य, कवितेचा रुणझुणता चरण यावरील आत्मचिंतनातून आलेले लेख

### गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## ज्याचं त्याचं एव्हरेस्ट

मला स्वत:ला प्रवासाची अत्यंत आवड आहे. देशात आणि परदेशात अनेक ठिकाणी मी भटकून आले आहे, परंतु मी सर्वाधिक प्रवास केला आहे तो हिमालयात. पर्यटन आणि ट्रेकिंग या दोन्ही उद्देशानं. पाठीवर सॅक घेऊन मैलोन्‌मैल अंतर चालताना तेथील गूढ रम्य सौंदर्यानं कधी भारावून गेले आहे तर कधी भीतीनं थरकले आहे. तिथल्या विरळ हवेत दमछाक झाल्यानं आपण हातीपायी धड जिवंत परत शकू की नाही याविषयीची अनिश्‍चितता अनुभवली आहे. हे सारं सोसल्यानंतरही तिथं जाण्याची ओढ कायम राहिली आहे. काय असेल यामागचं कारण? माझ्यासारख्या किरकोळ गिर्यारोहकाची ही अवस्था तर ज्यांचं आयुष्य गिरिशिखरांनी व्यापून राहिलं आहे, त्यामागचं कारण काय असेल? पर्वतराजीतील भव्यता आणि शांतता, रौद्रता आणि सात्त्विकता यांची त्यांना भुरळ पडत असेल? रक्त गोठविणारी थंडी, उन्हाचा तडाखा, निसर्गाचा लहरीपणा त्यांच्यातील धाडसी आणि अपराजित वृत्तीला सतत आव्हान देत असेल? शिखर काबीज करणं म्हणजे कुणा बलाढ्य शत्रूला नामोहरम करणं असं वाटत असेल? का त्यातून देवदर्शनाचं अलौकिक समाधान लाभत असेल? वेगवेगळ्या शिखरांवर चढाई करताना आत्तापर्यंत अनेक जण जायबंदी झाले आहेत, तर काही जण प्राणास मुकले आहेत. हे माहीत असूनही पुन:पुन्हा शिखरांकडे अनेकांची पावलं का वळत असतील? अशा वेळी त्यांचे प्रियजन त्यांना कशी साथ देत असतील? या प्रश्‍नांच्या मुळाशी जाऊन विचार करताना मला आद्य गिर्यारोहक जॉर्ज मॅलरी यांची आठवण झाली. गिर्यारोहणातील त्याचं कौशल्य आजही वादातीत मानलं जातं. १९२४ साली एव्हरेस्ट शिखर काबीज करताना ते मृत्युमुखी पडले. एकदा पत्रकारांनी त्यांना विचारलं होतं, ''तुम्ही पर्वत का चढता?'' त्यावर ते उत्तरले, ''ते तिथं आहेत म्हणून?'' किती मार्मिक




किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

उत्तर होतं त्यांचं! या पृथ्वीतलावर पर्वतांचं अस्तित्व जितकं नैसर्गिक आहे, तशीच ते चढून जाण्याची माणसाची आंतरिक ऊर्मीही. या उत्तराचं बोट धरून मी हिमालयावर लिहायचं ठरवलं. माझं पुस्तक हे हिमालयावर असलं तरी ते फक्त माहितीपर न लिहिता हिमालयाच्या अतर्क्य ओढीचा शोध घेणं हा माझा उद्देश होता. त्यासंबंधी विचार करताना या विषयाचा आवाका किती मोठा आहे याची जाणीव मला झाली. त्यामुळे कादंबरी हा साहित्यप्रकार मी निवडला. कादंबरी लिहिताना जॉर्ज मॅलरी यांच्या आयुष्यातील काही प्रसंग मी हेतुपुरस्सर निवडले असले तरी ही कादंबरी म्हणजे त्यांचं चरित्र नाही. इंग्रजीत रूढ असलेल्या फॅक्शन (fact + fiction) या साहित्यप्रकारात ती लिहिली आहे. मराठीत त्यासाठी वास्तव + कल्पना म्हणजे कल्पनास्तव असं म्हणायला हरकत नाही.

कादंबरीमध्ये हिमालयाची आणि विशेषत: एव्हरेस्ट मोहिमेची वर्णनं असली तरी कोणत्याही ललितकृतीचा गाभा हा माणसाच्या मनाचा शोध घेणं असतो याची मला जाणीव आहे. एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करण्याइतकंच माणसाच्या मनाचा तळ गाठता येणं ही अत्यंत अवघड प्रक्रिया. हिमालयाच्या अतर्क्य ओढीपायी माणसामाणसातील नातेसंबंध कसे फुलतात, कसे विस्कटतात हे चित्रित करणं हे माझ्यापुढचं आव्हान होतं. त्याबरोबरच हिमालयाची ओढ ही वैश्विक आणि काल ातीत असते हेही मला अधोरेखित करायचं होतं. त्यासाठी ७०/ ७५ वर्षांच्या काल खंडात भारत, दक्षिण आफ्रिका, अमेरिका, जपान, नेपाळ अशा विविध देशांत राहणाऱ्या व्यक्तिरेखा मी कल्पनेतून उभ्या केल्या आहेत. कादंबरीचा नायक विली एव्हरेस्ट शिखर सर करून आपल्या आजोबांचं स्वप्न पूर्ण करण्याच्या इच्छेनं झपाटला आहे. तो जन्मानं ब्रिटिश, आफ्रिकेत लहानाचा मोठा झालेला आणि नोकरीनिमित्त अमेरिकेत स्थिरावला आहे. त्याला लहानपणापासून गिर्यारोहणाची आवड. तर त्याचे वडील डेनीस यांनी गिर्यारोहणातील धोके अनुभवले असल्यामुळे त्यांना त्याविषयी वाटणारा तिटकारा. त्यापायी बापलेकामध्ये निर्माण झालेला दुरावा. आईची होणारी कुचंबणा. विलीच्या मिश्रवर्णीय मैत्रिणीमुळे - केझियामुळे त्यामध्ये पडलेली भर. कथेतील या मध्यवर्ती व्यक्तिरेखा. त्यांची मानसिकता आणि त्यांचे स्वभावविभाव यांचा वेध घेणं आणि परिस्थितीमुळे त्यांच्या नात्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव कथानकामध्ये गुंफणं हे माझ्यापुढील आव्हान ठरलं. त्यासाठी या साऱ्या व्यक्ती जगत होत्या त्या काळातील त्या-त्या देशातील राजकीय, सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थितीचा मी अभ्यास केला. चिंतन केलं. मनन केलं. तो करताना मला जाणवलं की जगाच्या पाठीवर कुठेही गेलं, तरी प्रत्येक देशात एक वर्गव्यवस्था असते. वर्णव्यवस्था असते. त्यापायी अनेकांच्या वाट्याला वंचना आणि वेदना येते. हे सारं जाणून घेण्यासाठी मी अनेक पुस्तकं वाचली. चित्रपट पाहिले. इंटरनेटची मदत घेतली. त्या-त्या देशाचा इतिहास आणि वर्तमान जाणून घेताना

माझ्या जाणिवांच्या कक्षा रुंदावत गेल्या. या अभ्यासात मी रमले असले तरी मला मिळालेल्या माहितीची कुरघोडी माझ्या कथानकावर होऊ नये याची मी खबरदारी घेतली. सुमारे अडीच वर्षं कादंबरीचं लेखन, पुनर्लेखन यासाठी लागली. हिमालयाच्या परिसरात फुललेली विली आणि केझियामधील प्रेमभावना, वर्णद्वेषाच्या वणव्यात कशी कोमेजून जाते. त्यातून ती दोघं स्वत:ला कसं सावरतात, समजून घेतात आणि मन:पूत जगण्यासाठी आधारही देतात, ही कादंबरीची रूपरेषा. एका निर्णायक क्षणी त्यांना परस्परांशी असलेल्या नात्याची, त्या दोघांच्या भवतालाशी असलेल्या नात्याची आणि त्याहून अधिक स्वत:शी असलेल्या नात्याची ओळख पटते. एव्हरेस्ट शिखर सर केल्यानंतर तिथं फडकविण्यासाठी विली सोडून त्याच्या टीममधील प्रत्येकानं आपापल्या देशाचा झेंडा नेलेला असतो. ते पाहून विलीच्या मनात येतं इंग्लड, आफ्रिका, अमेरिका वा भारत या कोणत्याच देशात माझी पाळंमुळं रुजलेली नाहीत. मग मी कोणत्या देशाचा? Where do I belong? शिखराकडे वाटचाल करताना मनाच्या सैरभर अवस्थेत त्याचं त्याला उत्तर मिळतं, 'मी या हिमालयाचा आहे. I belong to Himalaya.' हेच त्याचं एव्हरेस्ट आहे. तर मनातील न्यूनगंड आणि भयगंड दूर करून स्वत:कडे नितळ नजरेनं पाहता येणं हे केझियाचं एव्हरेस्ट ठरतं. बापलेकामध्ये मैत्रीचा साकव तयार होणं हे डेनीसच्या दृष्टीनं त्याचं एव्हरेस्ट असतं. प्रत्येकाचा आपापल्या आयुष्यातील 'एव्हरेस्ट' गाठण्याचा प्रवास सोपा नव्हता. अनेक अवघड वाटा-वळणं पार करणारा होता. त्यामध्ये ते यशस्वी होतात का नाही हे कादंबरीच्या अखेरपर्यंत उत्कंठा वाढविणारं ठरतं.

हिमालय आणि एव्हरेस्टच्या मोहिमेचं तपशीलवार वर्णन येणं ही मूळ कथानकाची मागणी होती. त्यासाठी एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केलेल्या व्यक्तींना मी भेटले. ट्रेकिंगच्या निमित्तानं मी हिमालयात भटकले असले तरी माझे अनुभव मर्यादित होते. ॲव्हेलाँचचा अनुभव मी घेतला नव्हता. 'एव्हरेस्ट'सारखे काही चित्रपट


ही आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची,
भौगोलिक तसेच मानसिकही. हेतू, साधने
आणि साध्य काहीही असो,
आहे कमालीची आनंददायी आणि चिंतनगर्भ.

आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे



किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

पाहिल्यामुळे हिमकडे कोसळताना चक्क बर्फाचा धुरळा उडतो यासारखी वर्णनं मी करू शकले. शिखर सर करताना शरीरमनाची होणारी प्रचंड दमणूक, ज्याला डेथझोन म्हटलं जातं असे; वाटेतील छाती दडपून टाकणारे चढउतार यांचं मी उभं केलेलं चित्र प्रत्ययकारी आणि बिनचूक व्हावं यासाठी मी प्रयत्नशील राहिले आहे. याची पोचपावती पुस्तकाविषयी आलेल्या असंख्य प्रतिक्रियांमधून मिळाली. त्यामध्ये सुप्रसिद्ध गिर्यारोहक उषा पागे आणि एव्हरेस्ट मोहिमेचे नेते उमेश झिरपेही आहेत. पुस्तक वाचताना 'आपणच एव्हरेस्ट चढत असल्याची भावना' अनेकांनी बोलून दाखवली. मराठीचे प्राध्यापक आणि समीक्षक चंद्रशेखर बर्वे यांसारख्या काही जाणकारांनी पुस्तकावर चित्रपट निघायला पाहिजे अशी इच्छा व्यक्त केली. लेखाच्या अखेरीस लेखिका आणि अनुवादिका विनया बापट यांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया देत आहे.

'ज्याचं त्याचं एव्हरेस्ट' ही कादंबरी वाचून संपली, पण अजूनही तो विषय मनात घोळत आहे. यातच ती किती प्रभावी झाली आहे ते दिसते. अतिशय



बारीक निरीक्षण, माहिती आणि तितकेच पकड घेणारे कथानक, मानवी भावनांचे सखोल चित्रण, खूप मोठा कॅन्व्हास, आणि या सर्वांचा एक अवघड असा समतोल... अशा अनेक गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो. लेखिका मृणालिनी चितळे यांनी लिखाणासाठी खूप मेहनत घेतलेली जाणवते. फार कोणी न हाताळलेला विषय कादंबरी या फॉर्ममध्ये बसवणे हे अवघड काम उत्तमच साध्य केले आहे.'

***मृणालिनी चितळे***




त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून
चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले...
सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले...
असा हा मुलखावेगळा कार्व्हर या पुस्तकातून
तुम्हांला भेटेल.

किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## आख्यान महानिर्वाण

मी आजवर अनेक नाटकं, चित्रपट, दूरदर्शन अशा विविध माध्यमांतून रंगमंच, रुपेरी पडदा आणि छोटा पडदा यांत लहानलहान भूमिका केल्या. पण काही कलाकृती मनात कायमच्या रुजतात, त्यांना कोंब फुटतात, त्यांची छोटी-छोटी रोपटी तयार होतात आणि काही वर्षांनंतर त्यांची मोठमोठी झाडंही होतात ही झाडं सावलीसारखी आपल्यावर छत्र धरतात. 'महानिर्वाण' हे असंच एक सतत स्मरणात राहणारं अफलातून नाटक!

'महानिर्वाण'च्या पहिल्या प्रयोगाला २२ नोव्हेंबर २०२४ रोजी पन्नास वर्षं पूर्ण झाली. २२ नोव्हेंबर १९७४ ते २२ नोव्हेंबर २०२४. 'महानिर्वाण'चं सुवर्णमहोत्सवी वर्ष! आजही हे नाटक तितकंच ताजं, टवटवीत आणि सदाबहार आहे याचा प्रत्यय ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सादर झालेल्या 'महानिर्वाण'चा प्रयोग पाहताना आला. नव्या दमाच्या नव्या कलाकारांनी 'नाटककंपनी' या आपल्या हौशी नाट्यसंस्थेतर्फे आपला पन्नासावा प्रयोग सादर केला. श्रीराम लागू रंगअवकाश, टिळक रोड, पुणे इथल्या नाट्यगृहात! त्यानिमित्त 'आठवणींचा बटवडा' हा गप्पावजा मुलाखतींचा कार्यक्रमही रंगला.

पर्ण पेठे या नव्या पिढीतल्या कलाकारानं लेखक-दिग्दर्शक आणि नानाची भूमिका करणारे सतीश आळेकर, पहिल्या प्रयोगापासून थिएटर ॲकॅडमीनं सादर केलेल्या 'महानिर्वाण'च्या प्रत्येक प्रयोगात भाऊराव ही भूमिका जिवंत साकारणारे अभिनेते आणि गायक चंद्रकांत काळे, पहिल्या प्रयोगात 'रमा'ची भूमिका करणाऱ्या डॉ. माधुरी गोरे (भावे), नंतर तीच भूमिका वठवणाऱ्या मंजिरी परांजपे, गौरी लागू, दोनशेहून अधिक प्रयोगांत 'नाना'ची भूमिका करणारे प्रसाद पुरंदरे, प्रकाशयोजना करणारे समर नखाते आणि आता प्रत्यक्ष हयात असलेले उदय लागू, श्रीराम पेंडसे, दिलीप जोगळेकर, प्रकाश अर्जुनवाडकर, दिलीप गोखले, पानवलकर आणि मी श्रीराम रानडे. 'प्रत्यक्ष हयात असलेले' हे शब्द मी या ठिकाणी जाणीवपूर्वक वापरले आहेत, कारण 'महानिर्वाण'च्या पहिल्या प्रयोगापासून आमच्यासमवेत काम करणारे संगीत दिग्दर्शक, वादक, आणि अनेक 'चाळकरी' या जगातून कायमचे निघून गेलेले आहेत. त्यांचं 'महानिर्वाण' झालेलं आहे.

'घाशीराम कोतवाल' या नाटकानंतर 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमेटिक असोसिएशन' ही पुण्यातली प्रायोगिक नाट्यसंस्था दुभंगली आणि नव्या विचारांच्या ४०-५०

कलाकारांनी २७ मार्च १९७३ (जागतिक रंगभूमी दिन) या दिवशी ‘थिएटर अॅकॅडमी’ ही नवी संस्था उभारली आणि ‘घाशीराम’ पुन्हा रंगमंचावर अवतरलं.

१९७४च्या राज्यनाट्य स्पर्धेत सतीश आळेकर लिखित आणि दिग्दर्शित ‘महानिर्वाण’ नाटक करण्याचं नक्की झालं. थिएटर अॅकॅडमीचं नाट्यस्पर्धेतलं हे पहिलं नाटक. टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या हॉलमध्ये सतीश आळेकरांनी आम्हा ३०-३५ कलाकारांसमोर हे नाटक वाचून दाखवलं आणि ऐकताना आम्ही रंगून गेलो. मृत्यूसारखा गंभीर विषय पण सतीशनं अत्यंत हसतखेळत, मानवी स्वभावावर भाष्य करणाऱ्या आणि वर्मावर बोट ठेवणाऱ्या अचूक शब्दांतून व्यक्त होणारा विनोद, कीर्तन परंपरेचं माध्यम आणि मध्यमवर्गातलं चाळ-संस्कृतीतलं जिवंत वातावरण! एकाएकी मरण पावलेला भाऊराव, त्याची गोरीपान देखणी बायको ‘रमा’, आट्यापाट्याचे सामने खेळण्यासाठी परगावी गेलेला मुलगा ‘नाना’ आणि चाळीतले इरसाल चाळकरी!

तालमी सुरू झाल्या, पण भाऊरावांची प्रमुख भूमिका करणारा आमचा चंद्रकांत काळे सपाटून आजारी पडला. ‘महानिर्वाण’चा स्पर्धेतील प्रयोग होण्याआधीच ‘महानिर्वाण’ राम म्हणणार का, अशी बिकट अवस्था निर्माण झाली. पण नाही. चंद्रकांत काळे पुन्हा नव्या दमानं उभा राहिला, तो अंगात काहीतरी संचारल्याप्रमाणेच.

२२ नोव्हेंबर १९७४ रोजी ‘महानिर्वाण’चा स्पर्धेतला प्रयोग तुफान रंगला. गाण्याला, अभंगाला, संवादाला आणि सर्वांच्या अभिनयाला रसिक प्रेक्षकांची उत्तम दाद मिळाली. ‘खणखणीत’ प्रयोग केल्याचं आणि अनुभवल्याचं समाधान आम्हा सर्व कलाकारांना आणि त्या दिवशी प्रयोगाला उपस्थित असलेल्या रसिक प्रेक्षकांना मिळालं. दुसरा दिवस उजाडला. त्या काल झालेल्या प्रयोगाच्या धुंदीतच मी डेक्कन जिमखान्यावरच्या पी.वाय.सी. ग्राउंडच्या भिंतीशी उभा राहून समोर चाललेली क्रिकेटची मॅच बघत उभा होतो. मागून माझ्या खांद्यावर हात पडला. तोंडात सिगारेट शिलगावलेला एक माणूस माझ्या मागे हसत उभा होता. अरे, हे तर प्रा. कमलाकर सोनटक्के! आमच्या नाट्यस्पर्धेतले एक परीक्षक. तेच म्हणाले, ‘‘मी असं सांगणं हे जरा स्पर्धेच्या नियमाला धरून होत नाही. पण सांगितल्याशिवाय राहवत नाही. कालचा तुमचा ‘महानिर्वाण’चा प्रयोग केवळ अप्रतिम! हे नाटक अंतिम फेरीसाठी निवडलं जाणार याची खात्री!’’ बरंच भरभरून बोलत होते आणि माझी छाती अभिमानानं फुलत होती.

कमलाकर सोनटक्के यांचं भाकीत खरं ठरलं आणि आम्ही अंतिम फेरीसाठी निवडलो गेलो. मुंबईतला स्पर्धेचा प्रयोगही तुफान रंगला. प्रयोगानंतर प्रेक्षकांनी वाजवलेला टाळ्यांचा अखंड गजर आजही माझ्या कानांत दुमदुमतो आहे. अंतिम फेरीतही ‘महानिर्वाण’नं अनेक बक्षिसं पटकावली.

आता ‘महानिर्वाण’चे प्रयोग सातत्यानं सुरू झाले. नाट्यकलेचा एक सर्वस्वी नवा

आविष्कार रंगमंचावर अवतरला.

१९७६ साली इचलकरंजी इथे साहित्य संमेलन संपन्न झालं. त्याचे अध्यक्ष होते महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे. भरत नाट्य मंदिराच्या एका प्रयोगाला पु.ल. आवर्जून उपस्थित होते. आट्यापाट्याच्या सामन्याहून परत येणाऱ्या नानाची प्रतीक्षा करणारे चाळकरी टाइमपास करण्यासाठी गाण्याच्या भेंड्या सुरू करतात -

'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' असा आम्ही गजर करताच बसल्या जागेवरून उभे राहून आणि टाळ्या वाजवून पु.लं.नी त्या प्रसंगाला दाद दिली.

त्यानंतरच्या दोन-तीन दिवसांतलीच गोष्ट!

पुण्यातल्या कुमठेकर रस्त्यावरच्या राज्य शिक्षणशास्त्र परिषदेच्या सभागृहात पु. ल. देशपांडे यांचा सत्कार समारंभ होता. अध्यक्षस्थानी होते प्रख्यात कथा-कादंबरीकार ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि. स. उर्फ भाऊसाहेब खांडेकर एकूणच साहित्य-नाट्यकलेचा वेडा मी त्या कार्यक्रमाला सामान्य प्रेक्षक म्हणून उपस्थित होतो. कार्यक्रम, सत्कार समारंभ छानच झाला.

कार्यक्रमानंतर आम्ही काही मित्रमंडळी बाहेरील आवारात गप्पा मारत उभे होतो. वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे आणि इतर मान्यवर हॉलच्या बाहेर येत होते. आम्ही उत्सुकतेनं त्यांच्याकडे पाहत होतो. अचानक गर्दीमधून वाट काढत पु.ल. माझ्याजवळ आले आणि माझ्या खांद्यावर शाबासकीची थाप टाकत म्हणाले, ''महानिर्वाण अप्रतिम! सांग सगळ्यांना! आणि घरी ये फोन करून. निवांत गप्पा मारू.'' आले तसे शाबासकी देऊन निघून गेले; पण माझ्यासाठी ऊर्जा देऊन गेले, पाथेय देऊन गेले.

पु.लं.च्या 'रूपाली'शेजारीच तुळपुळ्यांच्या बंगल्यात माझं बिऱ्हाड होतं,


या पुस्तकात एका प्रतिभावंत नाटककारानं साकारलीय
एक वेगळी भूमिका - वक्त्याची.
ललित लेख, मराठी भाषा, नाटक-विचार,
जी.एं.चं साहित्य अशा विविध विषयांवर
महत्त्वपूर्ण मतं मांडणाऱ्या सात व्याख्यानांचं सप्तक.



सप्तक

महेश एलकुंचवार

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ १६०/- । (ट.ख. ₹ ५०)

तेव्हापासून पु.लं.च्या घरी माझं वारंवार येणं-जाणं वाढलं. जब्बार पटेलांनी मला ‘सिंहासन’ चित्रपटात श्रीमंतराव शिंदे ही भूमिका माझ्या महानिर्वाण नाटकातल्या अतिउत्साही म्हाताऱ्याच्या भूमिकेमुळेच दिली असावी, हा माझा कयास आहे.

अशा ‘महानिर्वाण’च्या आठवणी!
कधीही न कोमेजणाऱ्या!
अजर! अमर!
अभंग! मृत्युंजयी!

***श्रीराम रानडे***
९८२३१४४७०९

हा आहे वंचित वर्गाचा अस्वस्थ करणारा उद्गार,
शब्दांची वाट तुडवत आपल्या जगण्यातील
दु:खवेदना बोलकी करणाऱ्या एका समंजस
चित्रकाराचा जीवनप्रवास.
तेव्हा जरूर वाचा - समृद्ध वाचनानुभव देणारं
हे कलावंताचं आत्मकथन.



काळ्यानिळ्या रेषा

राजू बाविस्कर

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)



ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक
कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो
त्याची नाही, तर पुनश्च ‘राखेतून उगवतीकडे’
निग्रहाने झेपावतो, त्याची आहे.

राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## स्मृती सोनेरी

मुक्त मोकळे हास्य खळाळे
शुभ्र रुपेरी मुकुट झळाळे
अखंड चाले चिवचिव सारी
नवी उभार नवी भरारी ।

उत्कट उत्तम तसेच टिकले
यात कोणते नवल वर्तले
कटू बोचऱ्या आठवणीतून
निर्मल कमल कसे उमलले ।

मुग्ध किशोरी स्मृती सोनेरी
स्नेह उजळत रात्र साजरी
तू-मी, ही-ती भेद निमाले
जल गेले गंगाजल उरले ।

दवबिंदूसम अलगद आले
मनी कोवळे भाव हळवे
नव्हते ठाऊक कोठे लपले
अवचित ते सामोरे आले ।

जीवन सरसर पुढे सरकते
सरिता सदैव एकच असते
संथ, खळखळ रूप बदलते
माझे मीपण अभंग उरते ।

प्रसन्न नाजुक क्षण बिलोरी
उमटे अक्षर चित्र अंतरी
सांज दाटता स्मरू परोपरी
अवीट अमूल्य प्रेमशिदोरी ।

***प्रसन्न दाभोलकर***

## 'राजहंसी' कवितादालन



माणसात लपलेल्या हिंस्रतेचे
अनेकविध पदर उलगडून दाखवणारा,
त्याच्यातल्या माणूसपणाचेही दर्शन घडवणारा

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)

हिमांशु कुलकर्णी यांच्या कवितेचा प्रकृतिधर्मच
असा आहे की, स्वत:शीच हळुवारपणे
गुणगुणल्यासारखीच ती व्यक्त होते.
या प्रकृतिधर्माशी सुसंगत अशी सूचकता
त्यांच्या कवितेत अगदी स्वाभाविकपणे आली आहे.
**- मंगेश पाडगावकर**

### दंवभिजली वही

हिमांशु कुलकर्णी

किंमत : ₹ १२०/- । (ट.ख. ₹ ५०)






अनिष्ट प्रथा, कर्मठता, शोषण,
अज्ञान अन् दारिद्र्य यांत
पिचत असलेल्या समाजाच्या
प्रगतीसाठी उमटलेला संवेदनशील सूर.

### अजान आणि चालिसा

मुबारक शेख

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

## अभिषेकी : कला आणि जीवनप्रवास

*अभिषेकीबुवांनी असंख्य मैफिली सजवल्या. अनवट रागांची ओळख दिली. अनोळखी शब्दवैभवाचे अभंग, अनेक कवितांची भावगीते आपल्या मुखात, कानात, मनात साठून राहिलेत, त्यांच्या अत्यंत मधुर भावपूर्ण चालींमुळे. त्यामागचा हा कठीण प्रवास कळला की, त्या कर्तृत्वाच्या तेजाने आपण अक्षरश: दिपून जातो..*

पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या ऐन उमेदीतल्या सुंदर, देखण्या छायाचित्राचे मुखपृष्ठ, दर्जेदार 'राजहंस प्रकाशन' आणि समर्थ लेखिका शैला मुकुंद यांची ओघवती भाषा असा संगम असलेले 'अभिषेकी' हे पुस्तक संगीतप्रेमींच्या भेटीस आले आहे.

शास्त्रीय संगीतातील एक विद्वान, अनेक घराण्यांच्या डोळस अभ्यासाने समृद्ध आणि आपली अशी 'अभिषेकी गायकी' निर्माण करणारे ज्येष्ठ कलावंत अशी पं. जितेंद्र अभिषेकी यांची ओळख आहे. महाराष्ट्राची तीन सांस्कृतिक लेणी - नाट्यसंगीत, अभंग, भावगीत अशा सर्व क्षेत्रांत देखणी मुशाफिरी करणारे बुवा, त्या स्वरसाधनेसाठी झालेला खडतर, कष्टप्रद सुरुवातीचा प्रवास आणि नंतर नावारूपाला आलेले वैभव हे सारे मांडणे तसे खूप कठीण. पण शैला मुकुंद यांनी अभ्यासपूर्ण, सहज भाषेत हा प्रवास मांडला आहे. त्यांचे कष्ट, धडपड जाणवते. वाचताना उत्सुकता वाटते. कधी मन व्याकुळते, कधी अचंबित होते.

मोठ्या कलाकारांच्या आयुष्यातल्या अनेक घटना काही लेख, मुलाखती यांतून रसिकांना माहीतही असतात. इथे वेगळे खूप काही भेटते, जे बहुसंख्य रसिकांना माहीतच नाही; कारण स्वत: अभिषेकीबुवांनी कधीच अशा गोष्टींचा उल्लेखही केला नाही. ज्या अडचणी, यातना, अपमान, दारिद्र्य बुवांनी सोसले, ते सारे संयत रितीने पोहोचवण्याचे काम लेखिकेने केले आहे. अभिषेकीबुवा मूळचे गोव्याचे. पुस्तकात सुरुवातीला पोर्तुगीज संस्कृती, मंदिरे, कला, धार्मिक, सांस्कृतिक, सांगीतिक परंपरा, एक जुने गोड गावातले जगणे अशा अनेक धाग्यांची गुंफण आहे. त्यातून उत्सुकांना

नवीन माहिती मिळते. शिष्य आणि इतर अनेकांच्या मुलाखती, भेटीगाठी, अभिषेकी परिवाराच्या मदतीने लेखिकेने मिळवलेले कौटुंबिक आणि इतर संदर्भ कळतात, जे आपल्या परिचयाचे असणे फारच कठीण.

अभिषेकीबुवांनी असंख्य मैफिली सजवल्या. अनवट रागांची ओळख दिली. अनोळखी शब्दवैभवाचे अभंग, अनेक कवितांची भावगीते आपल्या मुखात, कानात, मनात साठून राहिलेत, त्यांच्या अत्यंत मधुर भावपूर्ण चालींमुळे. त्यामागचा हा कठीण प्रवास कळला की, त्या कर्तृत्वाच्या तेजाने आपण अक्षरश: दिपून जातो.

या प्रवासात आदरणीय 'बायजीं'च्या प्रेमाचा, आस्थेचा ओलावा भेटतो. जयपूर घराण्याची एक शाखा 'खुर्जा घराणे' विस्तृतपणे उलगडते. बुवांचे आकाशवाणीवरचे प्रचंड काम, लेखन, संगीत, आर्थिक लढा आणि तत्त्वांमुळे नोकरी सोडणे हे सारे सामोरे येते. आपल्या मनाने नोटेशन करून जगन्नाथबुवांसमोर मांडलेला त्यांचाच 'जोगकंस' मोडूनतोडून कसा मांडला अन् माफी मागून, मागे लागून त्यांचेच शिष्यत्व कसे प्राप्त केले... ही घटना म्हणजे नवोदितांसाठी धडाच आहे. पं. रविशंकरांबरोबरचा पहिला अमेरिकेचा दौरा म्हणजे रविशंकरजींच्या गुणग्राहकतेची आणि बुवांच्या गुणवत्तेची पावतीच!

बुवा आणि शौनकजी यांचे पिता-पुत्र तसेच गुरू-शिष्याचे नाते हे हृद्य आहेच. पण सुगम संगीतात नाव मिळवलेल्या देवकी पंडित, जी लहानपणापासूनच बुवांची मानसकन्या आहे, त्या शास्त्रीय संगीताकरता किशोरीताईंकडे गेल्या. त्याला विरोध न करता, तिला मोकळीक देणारे बुवा म्हणजे 'आदर्श गुरू'!

असे कितीतरी प्रसंग, उत्तुंग कार्य या पुस्तकात वाचायला मिळेल, जे लेखिकेच्या संशोधनाची साक्ष देतात. केवळ नाट्य, सुगम संगीताशिवाय एक सखोल, डोळस,




बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी.
कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

मकरंद वृत्तीचे शास्त्रीय संगीतातले महान गायक ही प्रतिमा त्या मानाने फारशी उजळली नाही, याची खंतही लेखिका व्यक्त करते.

अत्यंत निरपेक्षपणे ‘गुरुकुल’ पद्धतीने बुवांनी सारे ज्ञान अक्षरशः वाटले, उधळले. पण हे गुरुकुलाचं स्वप्न सोपं खचितच नव्हतं. ते कुणी धनाढ्य नव्हते. तिथेच उभ्या राहिल्या समर्थ विद्यावहिनी! एका श्रीमंत घरातल्या, उच्चविद्याविभूषित, परदेशात शिकलेल्या असूनही आपली सारी स्वप्ने बाजूला ठेवून त्यांनी ही स्वरयात्रा अखंड जपली ती केवळ पतीचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून. घरातच राहणाऱ्या शिष्यांना आईची माया दिली. अकादमिक शिक्षण पूर्ण करायला लावले. दुखणी काढली. त्या खरेच ‘गुरुमाता’ होत्या. त्यांना कुणीच कधीच विसरणार नाहीत. म्हणूनच तर हे सारे लेखन अर्पण केलेले आहे...

ती. विद्यावहिनींच्या पवित्र स्मृतीला!

***डॉ. माधुरी जोशी***

*(महाराष्ट्र टाइम्स ‘संवाद’ पुरवणी,* १७ नोव्हेंबर २०२४मधून साभार)

## ‘ऐवज विचारांचा’

सखाराम हरि उपाख्य स. ह. देशपांडे हे गेल्या पिढीतील विचारवंत. अर्थशास्त्राचे प्राध्यापक, ‘समाज प्रबोधन पत्रिके’चे संपादक, ‘ग्रामायन’चे संस्थापक सदस्य आणि हिंदुत्व, धर्मनिरपेक्षता या विषयांवर साधार, मूलग्राही लेखन करणारे भाष्यकार ही त्यांची ओळख. विपुल ग्रंथसंपदा असूनही ते तसे दुर्लक्षित राहिले. सध्या राष्ट्रवाद, हिंदुत्ववाद आणि तदनुषंगिक प्रश्न मध्यगामी असताना सहंची तर्ककठोर आणि व्यापक हिंदुत्वाची मांडणी, धारदार बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्याला पुरेसे महत्त्व देणारी, पण ‘मी’पासून ‘आम्ही’पर्यंत जाणारे एकत्वाचे तत्त्वज्ञान राष्ट्रवादाच्या चौकटीत मांडणारी भूमिका समजून घेणे कालोचित ठरावे.

हिंदुत्वाच्या दोन मुख्य प्रवाहांचा विचार करता (संघाचे हिंदुत्व आणि सावरकरी हिंदुत्व) सह सावरकरांना अधिक जवळ होते. राष्ट्रवादाचे महत्त्व त्यांना मान्य असले, तरी हा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष चौकटीत असायला हवा, राज्यसंस्था धर्मनिरपेक्ष असणे इष्टच नाही, तर अपरिहार्य आहे असे ते प्रतिपादित. राष्ट्रवाद ही एक जगण्याची कला आहे, समाज म्हणून टिकून राहण्यासाठी अंतर्गत एकत्वाची भावना चिरेबंदी हवी. अखिल मानवतेचा विचार अवश्य करावा, पण त्याकरता आधी आपण जिवंत आणि समर्थ असावयास हवे, म्हणून राष्ट्रवाद हवा. राष्ट्रावरील निष्ठा म्हणजे प्रत्यक्षात इथल्या माणसांवरील निष्ठा होय. केवळ भूमीवरील निष्ठा उपयोगी नाही.

हा राष्ट्रवाद प्रत्यक्षात उतरवताना प्रादेशिक अस्मिताही जपल्या जाव्यात, राष्ट्रवाद म्हणजे एकसाची संस्कृतीचा रूळ सर्वांवरून फिरवणे नव्हे, असे त्यांचे प्रतिपादन होते. अर्थात, हा राष्ट्रवाद धर्मनिरपेक्ष असला, तरी तो संस्कृतिनिरपेक्ष नव्हे. येथे परंपरेचे पुनरुज्जीवन वा अनाठायी पूर्वगौरव मात्र अभिप्रेत नाही. ज्या राष्ट्रांना शून्यापासून सुरुवात करावी लागते, त्यांना परंपरेचा आधार नसतो, पण ज्या राष्ट्रांना हजारो वर्षांचा इतिहास आहे, त्यांना तो विसरायला लावण्यापेक्षा आधुनिक तत्त्वांशी, जागतिक संस्कृतीशी संबद्ध आणि विवेकाशी संवादी असे संस्कृती/परंपरेतले ऐहिक तत्त्वज्ञान सामावून घेतले, तर राष्ट्रवादाची चौकट परिपूर्ण होऊ शकेल.

हिंदू-मुस्लीम प्रश्न हा भारतातला सनातन प्रश्न आहे. या प्रश्नाशी भिडण्याकरता मुस्लीम समाजाला राष्ट्रीय जीवनात सामावून घेण्यासोबतच हिंदुसंघटन आवश्यक आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. अर्थात संघटन म्हणजे शिस्तबद्ध सैन्यउभारणी नव्हे, तर लोकशाहीशी सुसंगत असलेली तत्त्वे, राष्ट्राची उभारणी हे ध्येय आणि वैध स्वरूपाचे मार्ग वापरून एकात्मभावाची पेरणी म्हणजे संघटन, अशी त्यांची व्याख्या होती. अ. भि. शहा, नरहर कुरुंदकर, हमीद दलवाई हे पुरोगामी विचारवंत मुस्लीमप्रश्नाच्या मीमांसेत जिथे थांबले, तिथून पुढे कोंडी फोडून त्या प्रश्नावर स.हं.नी हिंदुसंघटन हा निष्कर्ष काढला, ही त्यांची वैचारिक महत्ता आहे.

**अर्थशास्त्रमीमांसा**

स.ह. हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक असल्याने त्यांची अर्थमीमांसा महत्त्वाची आहे. भांडवलशाहीत न्यायाची पूर्ण प्रस्थापना होत नसली, तरी ती होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची मुभा असते, म्हणून मी मर्यादित अर्थाने भांडवलशाहीवादी आहे, असे ते म्हणत असत. भारतीय परिप्रेक्ष्यात दारिद्र्यमीमांसा करताना मार्क्स यांचा विचार सदोष आणि अपुरा आहे, असे मत त्यांनी मांडले आहे. इतकेच नव्हे, तर हिंदू समाज विघटित राहण्यामागे आणि सांस्कृतिक ऐकात्म्य वरवरचे, क्षीण उरण्यामागे जातिआधारित व्यवसायांची चिरेबंद चौकट कारणीभूत आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. पर्यावरणविचार कंठाळी होत असून निसर्गाच्या जितके जवळ राहाल, तितके जीवन कष्टमय, असुरक्षित, भीतिग्रस्त होते, असेही ते म्हणत.

ही अर्थशास्त्रमीमांसा विचार करायला लावणारी आहे. भाषाशास्त्रज्ञ हा स.हं.चा आणखी एक पैलू होय. विश्वनाथ खैरे यांचा मराठी-तमिळमधले नाते उलगडून दाखवणारा, 'संमतविचार' सर्वार्थाने नवा असताना स.हं.नी त्यावर स्वतंत्र परिचयपर पुस्तक लिहिले. या सिद्धान्ताची एवढ्या विस्ताराने दखल घेणारे ते पहिलेच होत. साधारणतः व्यक्तिचित्रे लिहिताना लेखकाची आत्मप्रौढी, चित्रित व्यक्तीच्या खासगी बाबी समाजासमोर मांडण्याची असोशी या दोषांमुळे व्यक्तिचित्रांची व्यंगचित्रे होतात. स.हं.ची व्यक्तिचित्रे या दोषांपासून मुक्त आहेत.

पु. ग. सहस्रबुद्धे ते कुमार गंधर्व, अनुताई वाघ ते स.हं.चे शाळाशिक्षक असा हा पल्ला मोठा आहे. कुमार गंधर्व वा वामनराव देशपांडे यांच्यावरील लेखांतून स.हं.चे संगीतविषयक सूक्ष्म ज्ञानही दिसून येते. या व्यक्तिचित्रांत केवळ स्वभाववैशिष्ट्ये न नोंदवता समग्र माणूस उभा करण्यासोबतच त्या त्या क्षेत्राचे तत्कालीन अंत:प्रवाह उभे करण्याचे कसब महत्त्वाचे आहे. व्यक्तीबद्दल लिहिताना दाखवले गेलेले ताटस्थ्यही मनोहर आहे.

**शैलीविचार**

त्यांच्या एकूणच लेखनशैलीत विशेषत: व्यक्तिचित्रणांच्या संदर्भात, त्यांच्या भाषेला एक आखीव डौलदारपणा आहे. मांडणीच्या संदर्भात अर्थसघनता, सखोलता, व्यापकता सामावून घेणारा गोळीबंदपणा, पूर्णतेच्या शोधात निघालेल्या मनाचे चाचपडलेपण आणि निखळ शब्दविवेक हा त्या डौलाचा एक भाग आहेच, पण त्याला दुसरीही छटा आहे. ती म्हणजे अनुभवांच्या आणि अभ्यासाच्या व्यापकपणातून उतरणारी निरीक्षणवृत्ती.

एकेका व्यक्तीवरील वा विषयावरील भाष्य हे प्रत्यक्षात प्रदीर्घ काळ केलेल्या चिंतनाचा आणि प्रत्यक्षात केलेल्या कार्याचा परिपाक असतो. शब्दांच्या ठेक्यासहच त्यातल्या अर्थजाणिवेमुळेही अशा उक्तींचे निनाद मनात घुमत राहतात. अशी राजस शैली मराठीत दुर्मीळ आहे. त्यांच्या लेखनाच्या ‘राजहंस’ने प्रकाशित केलेल्या ‘ऐवज विचारांचा’ या पुस्तकातून या शैलीचे पानोपानी दर्शन घडेल.

***हर्ष अनिरुद्ध जोशी***

*(दै. सकाळ, दि. २० डिसेंबर २०२४मधून साभार)*

तत्त्वांशी तडजोड न करण्याची सचोटी. मिंधेपणा
अव्हेरणारा स्वाभिमान. या बळावरच व्यवस्थेतील भ्रष्ट
मानसिकतेविरुद्ध त्यांनी लढा दिला.
ही भ्रष्ट मानसिकता कधी ना कधी नष्ट होईल,
असा आशावाद जागवणारे आत्मकथन.

काळोखातून उजेडाकडे
भ्रष्टाचारी मानसिकतेशी लढा

लक्ष्मण कृष्णाजी पानसरे

किंमत : ₹ १६०/- । (ट. ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा




चीन जितका आधुनिक, तितकाच ऐतिहासिकही.
आजही भारताबरोबरचा संघर्ष असेल वा अमेरिकेशी स्पर्धा-
चिनी सत्ताधीश आपली धोरणं ठरवताना इतिहासात
दडलेल्या सूत्रांचा आधार घेत असतात. हे चकित
करणारं विलक्षण चिनी प्रारूप समजावून देणारं-

### मेड इन चायना

गिरीश कुबेर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/-
(ट.ख. ₹ ५०) । (हार्डबाऊंड)

हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो, तसे हे लेखही
सात्त्विक समाधान देणारे, चौफेर संचारणारे, प्रेरणेच्या
पणत्या पेटवणारे अन् भावविश्व समृद्ध करणारेही!

### ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)






१९५५ साली जन्मलेल्या मुलीची ही आत्मकथा.
मध्यमवर्गीय कुटुंब. विद्यार्थ्यांच्या आणि स्त्रियांच्या चळवळीतून
तिची जडणघडण झाली. व्यक्तिगत पातळीवर पुरुषप्रधानतेचा
संपूर्ण अभाव ते पुरुषप्रधानतेचा संपूर्ण प्रभाव
असा हा जीवनप्रवास आहे. समतेच्या तत्त्वावरची
अदम्य निष्ठा हा या कहाणीचा आत्मा आहे.

### हमरस्ता नाकारताना

सरिता आवाड

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

काय घडलं ‘राजहंसी’ नगरीत?

## ‘माझे शाळेतले प्रयोग’ पुस्तक प्रकाशन



पुढील ओळीत डावीकडून : दिगंबर मोरे, अजय पाटील, हनुमंत बिराजदार, संपत गायकवाड, एकनाथ आंबोकर, सुभाष चौगुले, महेश चोथे, सतीश घळी, स्मिता गौड, कृष्णात खोत, मीना शेंडकर, अनुराधा म्हेत्रे

मागील ओळीत : संजय काळे, आनंदसिंग मुरगोड

स्मिता गौड लिखित ‘माझे शाळेतले प्रयोग’ हे पुस्तक राजहंस प्रकाशनाने ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी प्रकाशित केले. या पुस्तकाच्या प्रकाशनाचा दिमाखदार सोहळा २५ ऑक्टोबर रोजी गडहिंग्लज येथील घाळी महाविद्यालयात पार पडला. विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लजचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, विभागीय शिक्षण उपसंचालक महेश चोथे, एसएससी बोर्डाचे सचिव सुभाष चौगुले, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक कृष्णात खोत, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य राजेंद्र भोई, शिक्षणाधिकारी माध्यमिक एकनाथ आंबोकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक मीना शेंडकर, शिक्षणाधिकारी (योजना) अनुराधा म्हेत्रे, माजी सहायक संचालक संपत गायकवाड, उपशिक्षणाधिकारी संजय काळे तसेच आनंदसिंग मुरगोड इत्यादी शिक्षण विभागातील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे आणि राजहंस प्रकाशनचे ज्येष्ठ संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी ऑनलाइन पद्धतीने पुस्तकास शुभेच्छा दिल्या.

लेखिका स्मिता गौड यांनी पुस्तकाचा परिचय करून देताना सांगितले, 'हे पुस्तक एका पहिली ते चौथीच्या वर्गास शिकवणाऱ्या शिक्षिकेचे शैक्षणिक प्रवासवर्णन आहे. पुण्याहून तीनशे किलोमीटर प्रवास करून ग्रामीण भागातील एका शाळेत शिक्षकपदी मी रुजू झाले, तेथून हा प्रवास सुरू होतो आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झाल्यानंतर शिक्षणाधिकारी वर्ग-एक पदी रुजू होण्यासाठी पुन्हा मी पुण्यात परतले तेथे तो संपतो. दरम्यानच्या पंधरा वर्षांत घडलेली शिक्षणापासून शिक्षणापर्यंतची ही गोष्ट आहे.'

आंबोकर यांनी पुस्तक कोणी कोणी वाचावे हे विशद करताना शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, पालक, शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांनी हे पुस्तक वाचले पाहिजे असा उल्लेख केला. राजेंद्र भोई यांनी नवनियुक्त शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी या पुस्तकाची शिफारस केल्याचे सांगितले.

कृष्णात खोत यांनी 'माझे शाळेतले प्रयोग' हे शिक्षणातला सृजन आनंद आहे. ते केवळ शाळेतले किंवा शिक्षणातले प्रयोग नसून हे जगण्यातले प्रयोग आहेत असे उद्‌गार काढले. सुभाष चौगुले यांनी पुस्तकातील भाषा ओघवती असून लेखनशैली अतिशय सुंदर असल्याचे सांगितले. महेश चोथे यांनी हे पुस्तक चौरस थाळीसारखे सकस व रुचकर असून एकदा वाचून सोडून न देता कायमचे संग्रही ठेवावे असे संदर्भ पुस्तक आहे असे सांगितले.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी 'या पुस्तकात लेखिकेचा एक शिक्षक ते शिक्षणाधिकारी हा प्रवास उलगडलेला असून हे पुस्तक वाचताना आपण जणूकाही एखादा चित्रपट पाहत आहोत अशा पद्धतीने प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहतात.' असे सांगितले. संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी लेखिकेच्या या संपूर्ण प्रवासास 'हे तो प्रचितीचे बोलणे' असे अधिष्ठान आहे, पुस्तकातील शब्दाशब्दातून नितळ पारदर्शीपणा झिरपतो. त्यांच्या शाळेतल्या प्रयोगात आपण हळूहळू सामील होत जातो, ओढले जातो हे या पुस्तकाचे यश आहे. हे पुस्तक शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाला मार्गदर्शक ठरेल अशी खात्री व्यक्त केली.

## पुणेकरांना भावली 'तेव्हाची गोष्ट'

उबदार नात्यांच्या शोधात असणाऱ्या, दु:खाकडे पाहण्याची वेगळी नजर लाभलेल्या, जगण्यातले दुर्दैवी वास्तव आणि विचित्र विरोधाभास समर्थ लेखणीतून मांडणाऱ्या हिमांशु कुलकर्णी यांच्या कविता, गझल आणि रुबायांच्या प्रभावी अभिवाचनाची अनुभूती 'तेव्हाची गोष्ट' या कार्यक्रमातून पुणेकरांनी घेतली.

महाराष्ट्र कल्चरल सेंटर आणि श्रीराम लागू रंग-अवकाश यांच्या 'स्टेज इज युवर्स' या उपक्रमांतर्गत सेतू अभिवाचन मंच, पुणेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन



डावीकडून अनिरुद्ध दडके, डॉ. सदानंद बोरसे, गीतांजलि जोशी, अपर्णा कुलकर्णी, दिलीप माजगावकर, हिमांशु कुलकर्णी, प्रा. मिलिंद जोशी आणि दीपाली दातार

करण्यात आले होते. गीतांजलि जोशी, अनिरुद्ध दडके आणि दीपाली दातार यांनी अभिवाचन केले. संहिता लेखन दीपाली दातार, दिग्दर्शन अनिरुद्ध दडके यांचे तर संगीत राघवेंद्र जेरे यांचे होते. कार्यक्रमाला हिमांशु कुलकर्णी यांच्यासह राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

*मूळ, मूळ नसतं दफनवलेले फूल असतं*
*पानं, पानं नसतात उन्हासाठी पसरलेले हात असतात*

अशा काव्याची निर्मिती पहिल्यांदा कवी हिमांशु कुलकर्णी यांच्याकडून झाली. नोकरीनिमित्त देश-विदेशात फिरताना मनाला भावलेला निसर्ग, दृष्टीस पडलेली सामाजिक विषमता, रूढी-परंपरांच्या जोखडात बांधलेल्या-पिचलेल्या स्त्री मनाच्या व्यथा अशा कितीतरी गोष्टींनी त्यांच्या संवेदनशील मनाला हाक घातली आणि त्यातून त्यांच्या लेखणीतून कविता, रुबाया उमटत गेल्या.

कवी हिमांशु कुलकर्णी यांनी परक्या भाषेतील रुबाई हा काव्यप्रकार आपल्या भाषेत आणताना, आपली संस्कृती आणि भौगोलिक परिसर यांचे भान जपले म्हणूनच मातीचा अनुबंध आणि मराठी संस्कृतीचा गंध त्यांच्या रुबायांमध्ये सहजतेने जाणवतो आणि तिचे परकेपणच संपते. जन्म-मृत्यूचे वास्तव, राधा-कृष्णाचे भावबंध, स्त्रीची सामाजिक स्थिती हे विषय मांडताना त्यांनी परखड शब्दांचा वापर केला आहे.

'हात हातात घेत होते तेव्हाची गोष्ट', 'ही दुनिया म्हणजे मोठा एक फलाट', 'या जंगलातले सगळेच वड', 'ही रुबाई आवडण्याची सक्ती नाही दोस्त', 'कोण

म्हणतं चंद्र एकच असतो', 'तू आणि मी सारखेच आहोत दोस्त', 'अश्रूंना आता मोल राहिले नाही', 'वेगळी वेगळी यादी अपराधांची', 'पुतळा झाला म्हणून हुरळून जाऊ नकोस', 'झटकन सुकणारी मरणाची शाई असते', असा गूढ भावार्थ दडलेल्या रचनांनी कार्यक्रमात विशेष दाद मिळविली.

माणसाच्या भावनांचे हिंदोळे दर्शविताना त्यांनी लिहिलेल्या 'जगणे गहाण माझे उसनेच श्वास आता, वाळूत मृगजळाचे फसवेच भास आता' या काव्यपंक्ती रसिकांना विशेष भावल्या. मंद पार्श्वसंगीतासह उत्तरोत्तर रंगत केलेली ही अभिवाचनाची मैफल रसिकांच्या मनाचा ठाव घेणारी ठरली.

## 'पाकिस्तान का मतलब क्या?' अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून प्रशांत दीक्षित, दिलीप माजगावकर, श्रीधर लोणी आणि पराग करंदीकर

महाराष्ट्र टाइम्सच्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक श्रीधर लोणी यांच्या 'पाकिस्तान का मतलब क्या?' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन नुकतेच करण्यात आले. या प्रसंगी प्रशांत दीक्षित, दिलीप माजगावकर, श्रीधर लोणी आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे संपादक पराग करंदीकर उपस्थित होते.

❖

# वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## विवाह नाकारताना

'विवाह नाकारताना' हे वेगळ्या स्वरूपाचे अनुभव व्यक्त करणारे आत्मकथन वाचले. खूप आवडले. आत्तापर्यंत स्त्रियांच्या आत्मकथनांमधून अनेक जीवन-प्रवाह वाचकांसमोर आले, पण अशा प्रकारे स्वतंत्रपणे एकल राहण्याचा निर्णय घेणाऱ्या स्त्रीला समाजात वावरताना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कोणत्या प्रसंगांना आणि होणाऱ्या मनस्तापांना सामोरे जावे लागते असे अनुभव व्यक्त करणारा जीवनप्रवाह या लेखनाद्वारे वाचकांसमोर आला आहे, हे या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याची लेखनशैली बरीचशी धीट आणि परखड आहे. काही वेळा इतके स्पष्टपणे लिहिण्याचे धाडस सगळ्यांनाच करता येत नाही पण तेही तुम्हाला साधले आहे, त्यामुळे हे आत्मकथन वाचकांच्या मनाचा ठाव घेते. या लेखनात बऱ्याच वेळा आत्मशोध घेण्याचाही तुमचा प्रयत्न लक्षात येतो, हीदेखील पुस्तकाची जमेची बाजू आहे. एक वेगळेच अनुभवविश्व तुम्ही वाचकांसमोर मांडले आहे. मला पुस्तक खूप आवडले.

'राजहंस'तर्फे या पुस्तकाची ऑडिओ ओळख करून देण्यात आलेली आहे त्याचे स्वरूप लेखिकेशी गप्पा चर्चा आणि काही भागांचे अभिवाचन असे आहे. त्यातील वाचनासाठी निवडलेले उतारे खूपच परिणामकारक आहेत. त्यामुळे पुस्तकाचे मर्म नेमकेपणाने वाचकांसमोर उभे राहते. आणि या स्वरूपाच्या जीवनातील प्रश्न वाचकांसमोर ठसठशीतपणे उभे राहतात.

खूप खूप अभिनंदन आणि शुभेच्छा.

***उज्ज्वला गोखले***

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा
**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**
**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**‘राजहंस ॲप’**

Download on the App Store — आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play — अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता
Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अनुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

# व्हेरिकोज व्हेन्स



## आजाराची वृद्धी व तीव्रता कमी करण्यासाठी उपयुक्त आयुर्वेदिक तेल

लक्षणे - पाय दुखणे, पायाला सूज येणे, पाय जड वाटणे, पायांच्या शिरा फुगून वेड्यावाकड्या होणे आणि प्रगत अवस्थेत तळपायाजवळ फुटून रक्तस्त्राव होणे. व्याधी दुर्धर अवस्थेत जाण्यापूर्वीच वापरण्यास सुरुवात करा.






सूचना : व्हेरिकोज व्हेन्स ही एक दुर्धर व्याधी आहे. हे तेल विकाराची तीव्रता कमी करणे व प्रगती रोखणे आणि वेदनांपासून आराम देण्यासाठी आहे. प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृती, विकाराची तीव्रता आणि शारिरिक प्रतिसाद यानुसार परिणामांमध्ये फरक पडू शकतो.

| 100 ml पॅक | 200 ml पॅक |
|---|---|
| MRP Rs. 450/- | MRP Rs. 750/- |

(सर्व करांसहित)



**सर्वत्र प्रमुख मेडीकल स्टोर मध्ये उपलब्ध**

**वेरिहील कॅप्सूल्स** सुद्धा उपलब्ध

**Esvee Pharmachem Pvt. Ltd.**
412, Narayanpeth, Pune - 411030.
Ph :020 24450072 / 73.

**Helplines** (10 am to 6 pm only) **: 7888011004 ; 9423044267**

Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)


# केस गळतायेत?






मजबूत व निरोगी केसांसाठी

नोविग

रोज सकाळ - संध्याकाळ
१-१ गोळी

**मेडीकल व आयुर्वेदिक स्टोअर्समध्ये उपलब्ध**

आपल्या परिसरात उपलब्धतेसाठी Whats App वर संपर्क करा

वितरक : एस्व्ही फार्माकेम प्रा. लि. 412, नारायण पेठ, मुंजाबा लेन, पुणे- 411030.

eSVee 9423044267 ✆ 7888011004

FIND US ON


प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी
रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ,
पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे